शुध्द आरोग्यदायी ड्रायफ्रुटस्

| | | | | |
|---|---|---|---|---|
| काजु | खिसमिस | खोबरं | केर सांगरी | मेलन सीडस् |
| बदाम | काळा मनुका | गाईचे तुप | कागदी बदाम | खारीक खोबरं मिक्स |
| अंजीर | जरदाळू | धावडा डिंक | सनफ्लॉवर सीडस् | खारा काजू |
| अक्रोड | मखाना | मामरा बदाम | चिया सीडस् | मसाला काजू |
| खारा पिस्ता | खारीक | खजुर | पमकीन सीडस् | खारा बदाम |

ड्राईड पायनापल, मँगो, किवी, स्ट्रॉबेरी, पॉमेलो, क्रॅनबेरी, मिक्स फ्रुट

उत्कृष्ट दर्जा माफक दर...
भूमी एजन्सीज
सुकामेवा आणि मसाल्याचे ठोक व किरकोळ विक्रेते
Follow us @bhoomiagencies
मिक्स खडा मसाला उपलब्ध
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



स्नेह भोज
स्वाद दिल से दिल तक!
बारसे, डोहाळे जेवण, साखरपुडा, गेट टू गेदर
अश्या छोटेखानी समारंभांसाठी
परफेक्ट हॉल आणि सोबत
स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये
सुटसुटीत कार्यक्रम
रुचिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहमदनगर
86 98 8080 88



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. २४.०९.२०२४ | अंक नं. १७४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020


# नगर शहर आणि परिसरात महिनाभरात दुसऱ्यांदा अतिवृष्टी

## सीना नदीला पुन्हा पूर, कल्याण रोडवरील पूल पाण्याखाली, पहाटेपासून बराच काळ वाहतूक ठप्प

नगर - नगर शहर परिसराला सोमवारी (दि.२३) रात्री मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले. या पावसामुळे सीना नदीला मोठा पूर आला होता. कल्याण रोडवरील पूल पाण्याखाली गेल्याने पहाटेपासून या रोडवरील वाहतूक ठप्प झाली होती. पावसामुळे शहरातील अनेक भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. शहर परिसरात महिनाभरात दुसऱ्यांदा अतिवृष्टीची नोंद झाली असून सीना नदीलाही दुसऱ्यांदा पूर आला.



नगर शहर परिसरात सोमवारी (दि.२३) रात्री मुसळधार पाऊस झाल्याने नगर-कल्याण महामार्गावरील सीना नदीवरील पूल पाण्याखाली गेला होता. त्यामुळे दोन्ही बाजूने वाहतूक ठप्प झाली होती.

शहर परिसरात गणेशोत्सवानंतर पुन्हा अधून-मधून पाऊस सुरु आहे. शुक्रवारी (दि.२०) रात्री जोरदार पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर सोमवारी (दि.२३) सकाळीच काही भागात पाऊस झाला होता. दिवसभर ढगाळ वातावरण होते. पण सायंकाळनंतर विविध भागात विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटात पाऊस सुरू झाला. नगर शहर परीसराबरोबरच तालुक्यात अनेक भागात या पावसाने जोरदार हजेरी लावली. शहर परिसरात सर्वत्रच मुसळधार पाऊस झाल्याने सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. रात्रभर अधून-मधून पावसाचा जोर वाढत होता

नागापूर तर ढगफुटीसदृश पाऊस कोसळल्याने आणि सावेडी परिसरात पावसाचा जोर जास्त असल्याने सीना नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला होता. या पुरामुळे कल्याण रोडवरील पूल पाण्याखाली गेल्याने या रोडवरील वाहतूक ठप्प झाली होती. महिनाभरापूर्वी दि. २३ ऑगस्ट रोजी रात्रीही शहर परिसरात अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे सीना नदीला या वर्षीचा पहिला पूर आला होता. सोमवारी बरोबर एक महिन्याने पुन्हा अतिवृष्टी झाली आणि सीना नदीला दुसऱ्यांदा पूर आला.

### नागापूर, चास मंडलात अतिवृष्टी

या मुसळधार पावसामुळे शहर परिसरातील नागापूर आणि नगर तालुक्यातील चास या २ मंडलात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. नागापूर मध्ये ७३.५ मिमी तर चास मंडलात तब्बल १०२.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या शिवाय सावेडी मध्ये ५७.५ मिमी, नालेगाव २३ मिमी, कापूरवाडी ४१.८ मिमी, केडगाव ३.८ मिमी, भिंगार २७.३ मिमी, जेऊर १८.८ मिमी, चिचोंडी पाटील मध्ये ३७ मिमी, वाळकी ४५.३ मिमी, रुईछत्तीसी १० मिमी, नेप्ती ४५ मिमी अशी पावसाची नोंद झाली आहे.

### जिल्ह्यात नगर, पारनेर, राहुरीत मुसळधार

नगर शहर परीसरासह संपूर्ण जिल्ह्यात सोमवारी रात्री कुठे मुसळधार तर तुरळक पाऊस झाला आहे. जिल्हा प्रशासनाकडे नगर, पारनेर व राहुरी या ३ तालुक्यात मुसळधार पाऊस झाल्याची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये नगर - ४०.५ मिमी, पारनेर - ६१.२ मिमी, राहुरी - ४८.६ मिमी, श्रीगोंदा - २७.१ मिमी, कर्जत - ६ मिमी, जामखेड - ०.५ मिमी, शेवगाव - २.४ मिमी, पाथर्डी - १३ मिमी, नेवासा ६.१ मिमी, संगमनेर - १७.१ मिमी, अकोले - १०.२ मिमी, कोपरगाव - ११ मिमी, श्रीरामपूर - २२.६ मिमी, राहाता - १९.७ मिमी असा जिल्ह्यात सरासरी २३.८ मिमी पाऊस झाला आहे.




मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी सुरु केलेल्या उपोषणाच्या समर्थनार्थ नगरमध्ये उपोषणास बसलेले आंदोलक. (छाया - लहू दळवी)

# मराठा आरक्षणासंदर्भातील मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार

## नगरमधील उपोषणकर्त्यांचा निर्धार, एकाची प्रकृती आणखी खालावली

नगर - मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्या राज्य सरकारने मान्य कराव्यात. मागण्यांबाबत शासन जोपर्यंत निर्णय घेत नाही तोपर्यंत आम्हीही जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ सुरू केलेले आमरण उपोषण सुरूच ठेवणार असल्याचा निर्धार नगरमध्ये उपोषण करत असलेले गोरख दळवी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू असून त्यांच्या समर्थनार्थ नगर तहसील कार्यालयासमोर गोरख दळवी, संतोष आजबे, सखाराम गुंजाळ हे उपोषणास बसले आहेत. उपोषणाचा मंगळवारी (दि. २४) पाचवा दिवस असून, उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यात आजबे यांची प्रकृती अधिक खालावली असून, वैद्यकीय पथकाकडून त्यांची नियमित तपासणी केली जात आहे.

दरम्यान शासन आरक्षणासंदर्भातील मागण्या जोपर्यंत मान्य करत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका या आंदोलकांनी घेतली आहे.

# सीना नदीवरील पुलाचे काम दिवाळीपूर्वी पूर्ण न केल्यास आंदोलनाचे फटाके फोडू

## पोस्टरबाजी करणाऱ्यांनी कोणत्याही नियोजनाशिवाय कामे सुरू करून नगरकरांचे हाल चालवलेत

नगर - नगर- कल्याण रोडवरील सीना नदीवरील नवीन पुलाचे काम अतिशय धिम्या गतीने सुरू असल्याने या परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सोमवारी सायंकाळी संततधार पाऊस पडला आणि या रस्त्यावरील वाहतूक पुन्हा ठप्प झाली. शाळकरी विद्यार्थी, नोकरदार, वयोवृद्ध नागरिकांचे प्रचंड हाल झाले. शहरात सध्या पोस्टरबाजी करून विकासकामांचा गवगवा केला जात आहे. पण विकासकामे करताना कुठलेही नियोजन नाही. नागरिकांना होणाऱ्या त्रासाचा कोणताही विचार न करता ऐन पावसाळ्यात केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कामे सुरू करण्यात आली आहेत. मागील महिन्यातच सीना नदीला पूर आल्याने कल्याण रोडवरील वसाहतींचा नगर शहराशी संपर्क तुटला होता. त्यावेळी अधिकाऱ्यांसमवेत पाहणीचे फोटोसेशन करण्यात आले. प्रत्यक्षात पुन्हा अशी परिस्थिती उद्‌भवणार नाही, यासाठी कोणतीही उपाययोजना झाली नाही, हे कालच्या पावसाने सिद्ध झाले आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी केली आहे.



अभिषेक कळमकर

अभिषेक कळमकर यांनी म्हटले आहे की, केंद्र सरकारच्या निधीतून कल्याण रोडवरील सीना नदीवर नवीन पूल बांधण्यात येत आहे. या कामाचे श्रेय घेऊन लोकसभा निवडणुकीपूर्वी कामांचे भूमिपूजन करण्यात आले. अवघ्या दीडशे ते दोनशे मीटर लांबीच्या या पुलाचे काम ऑगस्टअखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु अजून ३० टक्के कामही झालेले नाही. याच गतीने काम सुरू राहिले तर पुढील पावसाळ्यातही काम पूर्ण होईल की नाही, अशी शंका आहे. शहरातील स्टेशन रोडवरील मोठा पूल दीड पावणेदोन वर्षात तयार झाला. मग या छोट्याशा पुलाच्या कामात माशी कुठे शिंकली, याचे उत्तर नगरकरांना मिळाले पाहिजे. अशी कामे पावसाळ्यानंतर हाती घ्यावी इतके साध व्हिजनही कामाचे श्रेय घेणाऱ्यांना नाही, हे नगरचे दुर्दैव आहे. विकास फक्त पोस्टर लावून होत नाही तर त्यासाठी योग्य नियोजन हवे असते. सीना नदीवरील पुलाचे काम संबंधित यंत्रणेने दिवाळीपूर्वी पूर्ण करावे अन्यथा ऐन दिवाळीत संबंधित यंत्रणेच्या कार्यालयात आंदोलनाचे फटाके फोडू, असा इशारा कळमकर यांनी दिला आहे.




महसूल विभाग स्तरावरील बदल्या रद्द करा, यासह विविध मागण्यांसाठी मोटारवाहन विभाग कर्मचारी संघटनेच्यावतीने बेमुदत संप पुकारल्याने आरटीओ कार्यालयात पसरलेला शुकशुकाट. (छाया - बबलू शेख)

# कर्मचारी बेमुदत संपावर; आरटीओचे कामकाज ठप्प

नगर - अनेक वर्षाच्या आपल्या प्रलंबित विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) कर्मचाऱ्यांचे ६६ वर्ष नेतृत्व करणाऱ्या मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने मंगळवारपासून (दि.२४) बेमुदत संप सुरु केला आहे. त्यामुळे नगरमधील दैनंदिन कार्यालयीन कामकाज झाले पूर्णपणे ठप्प झाले आहे.

कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाबरोबर वाहन चालक, मालक हे ग्राहक सेवेचे काम करावे लागते. यामुळे प्रशासकीय कामात गुंतागुंत निर्माण झाली आहे. या दुहेरी कामांच्या बोजामुळे कर्मचारी त्रस्त आहेत. महसुली विभागीय बदल्यांचे धोरण रद्द करण्यात आले नाही. विभागीय परीक्षांमध्ये अनावश्यक बदल करण्यात आले आहेत. आकृतीबंधाची योग्य अंमलबजावणी केली जात नाही. कर्मचाऱ्यांच्या हिताच्या कळसकर समितीच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणे, बदल्या, बढत्यांमध्ये सेवा ज्येष्ठतेचा विचार न करणे. या कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत. मोटार वाहन कर्मचारी संघटनेने वेळोवेळी या मागण्यांविषयी शासनाकडे दाद मागितली आहे. त्याची दखल शासनाने घेतली नाही. केवळ तोंडदेखली आश्वासने देऊन कर्मचाऱ्यांची वेळोवेळी बोळवण करण्यात आली. त्यामुळे यावेळी लेखी स्वरुपात मागण्या मान्य झाल्याचे पत्र परिवहन विभागाकडून दिले जात नाही, तोपर्यंत बेमुदत बंद मागे घेतला जाणार नाही, असे प्रशासकिय अधिकारी प्रशांत पाटील यांनी सांगितले.

### मागण्यांवर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरु

या संपामुळे दैनंदिन कार्यालयीन कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे. संप सुरु राहिल्यास वाहनांशी संबंधित कामे रखडणार असून याबाबत वरिष्ठ कार्यालयास माहिती देण्यात आली आहे. वरिष्ठ स्तरावर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे नगर येथील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी सांगितले.

# बाजार समितीच्या आवारात घाणीचे साम्राज्य, शेतकरी, हमालांचे प्रचंड हाल

## ३ दिवसांत स्वच्छता न केल्यास कचरा कार्यालयात टाकण्याचा संदेश कार्लेंचा इशारा

नगर - एकीकडे देशभरात स्वच्छता ही सेवा पंधरवडा सुरु असून नगरमध्येही महापालिका विविध भागात स्वच्छता अभियान राबवित आहे. स्वत: मनपा आयुक्त स्वच्छतेसाठी रस्त्यावर उतरले आहेत. दुर्दैवाने महापालिका प्रशासन तसेच बाजार समिती प्रशासनाचे बाजार समितीच्या आवारातील घाणीच्या साम्राज्याकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे.



बाजार समितीच्या आवारात झालेल्या घाणीच्या साम्राज्याची पाहणी करताना शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख संदेश कार्ले.

ग्रामीण भागातून दररोज बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना, हमाल मापाड्यांना तसेच व्यापाऱ्यांनाही जागोजागी साठलेल्या घाणीचा सामना करावा लागत आहे. पावसाने सर्व चिखल झाला आहे. पाण्याचे डबके साचलेले आहेत. शेतकऱ्यांना माल उतरवण्यासाठी जागा नाही. घाणीमुळे चांगला मालही खराब होत असल्याने मनपा तसेच बाजार समिती प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहिम राबवावी अन्यथा कचरा, गाळ बाजार समितीच्या कार्यालयात टाकला जाईल, असा इशारा शिवसेनेचे माजी जि.प.सदस्य संदेश कार्ले यांनी दिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून पावसामुळे तसेच स्वच्छतेच्या अभावी नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीतील भाजीपाला मार्केट व परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. संदेश कार्ले यांनी मंगळवारी (दि.२४) सकाळीच बाजार समिती गाठून परिस्थितीची पाहणी केली. शेतकऱ्यांचे हाल पाहिल्यावर त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. बाजार समितीत शेतकऱ्यांना सर्व प्रकारच्या सुविधा देणे बाजार समितीचे काम आहे. याशिवाय महापालिकेनेही वेळोवेळी स्वच्छता करून रोगराई पसरणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे. मात्र सध्या मनपा व बाजार समिती प्रशासन दोघांनीही शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे.

या परिसरातील घाणीमुळे, चिखलामुळे अनेक शेतकरी आजारी पडत आहेत. हमालांनाही काम करताना प्रचंड हाल सहन करावे लागत आहे. मनपा आयुक्त स्वत: रस्त्यावर उतरुन स्वच्छता करीत असल्याचे फोटो पेपरमध्ये झळकतात. मग त्यांना बाजार समितीचे आवार दिसत नाही का? या परिसरातील कचरा, घाणीमुळे शेतमालाचे, भाजीपाल्याचे नुकसान होत आहे. तीन दिवसात बाजार समितीच्या आवारातील गाळ काढून स्वच्छता करावी अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा कार्ले यांनी दिला आहे.


वाढलेल्या
वजनाने
त्रस्त आहात?
वजन कमी
करणे झाले
सहज शक्य
7020025541



SONI TILES
Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


## संवेदनशील जीवनातली पोकळी...

कलाकार मग तो छोटा असो वा मोठा, रंगभूमीचा असो की सिनेसृष्टीचा... जीव ओतून काम करीत असतो. हे जीव ओतणं पुढे पुढे कमी होत जं... मन भरतं...

=कलाकारांची खरी शोकांतिका हीच की कलावंतापेक्षा तो अभिनेता म्हणून पॉवरफुल ठरू लागला की लगेच पब्लिक त्याला डोक्यावर घेतात! मग खऱ्या कलावंताच्या मनात एक भयाण पोकळी तयार होते.

कलाकाराच्या मनात निर्माण होणारी पोकळी हा त्याचा जिवंत मरणाचा शाप आहे. तिला तोंड देणं भल्या भल्या दार्शनिकालाही जमलेलं नाही.

आपल्या जवळ बंगला, मोटारी, पैसा, यश, प्रसिद्धी सगळं काही असतं

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

नि त्याचवेळी आपण आपली उभारी गमावत, मनातून पोकळ होत असतो.

ऐश्वर्य नसतं तेव्हा ते मिळवण्याची जिद्द असते. मिळतं तेव्हा उपभोगावरची वासना मरून गेलेली असते! या अनामिक पोकळीनेच गुरुदत्त सारख्या कलाकाराला बरबाद केलं. याच अथांग पोकळीत मीनाकुमारी हरवून गेली. विमी नावाची जुनी नटी, राजकिरण, सुशांत हे तर सर्वकाही मिळण्यापूर्वीच या पोकळीची दुर्दैवी शिकार ठरली.



# केंद्र सरकारच्या माध्यमातून लवकरच नगरमध्ये २० इलेक्ट्रिक बस धावणार

### आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन



कामगारांसाठी सिटी बस सेवेचा शुभारंभ करताना आ. संग्राम जगताप. (छाया - लहू दळवी)

**महानगरपालिकेच्या वतीने एमआयडीसीतील कामगारांसाठी सिटी बस सेवेचा शुभारंभ**

नगर - कामगार वर्ग हा समाजातील महत्त्वाचा घटक असून, देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा आहे नगर एमआयडीसी मधील कामगारांचा सुरक्षित प्रवास करता यावा यासाठी उद्योजकांनी बस सेवा सुरू करण्याची मागणी केली होती तसेच एमआयडीसी मधील कामगारांसाठी सिटी बस सेवा सुरू व्हावी यासाठी सुमित लोढा यांनी पाठपुरावा केला त्यानंतर तातडीने महापालिकेच्या माध्यमातून सिटी बस सेवा सुरू केली आहे. लवकरच माळीवाडा येथे भव्य दिव्य बस स्थानक उभे राहणार असून त्याचे काम सुरू होणार आहे केंद्र सरकारच्या माध्यमातून लवकरच २० इलेक्ट्रिक बस शहरांमध्ये धावणार असून केडगाव येथे बस डेपोचे काम सुरू होणार आहे इतिहासाचा वारसा जोपासत आपण शहरांमध्ये नवनवीन प्रगतीच्या संकल्पना राबवत आहोत मागील २५ वर्षाचा विकासाचा बॅकलॉग भरत असताना प्राथमिक सुख सुविधा पासून काम करावे लागले आहे सर्वांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून आपले शहर म्हणून त्याच्याकडे पाहिले पाहिजे. या पुढील काळात एमआयडीसीमध्ये मोठ मोठे उद्योग आणण्यासाठी पुढाकार घेतला जाणार आहे. बस सेवेच्या माध्यमातून महिला भगिनीचा सुरक्षित प्रवास होणार आहे शहरातील उद्योजकांनी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करत युवकांना रोजगार देण्याचे काम केले आहे चांगल्या कामासाठी आवाज द्या तुमच्या हाकेला नक्कीच ओ देईल असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले

नगर एमआयडीसीतील श्री रेणुका माता मंदिर येथे अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने एमआयडीसीतील कामगारांसाठी सिटी बस सेवेचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला.

यावेळी आमी संघटनेचे माजी अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सुमित लोढा, माजी नगरसेवक सागर बोरुडे, जल अभियंता परिमल निकम, मिलिंद कुलकर्णी, शंतनू गाडे, संजय बंदिस्ती, दिलीप अकोलकर, सागर निंबाळकर, सचिन पाठक, सचिन काकड, दीपक नागरगोजे, श्री. पानसरे, श्री. सीक्रे, सुकी गुगळे, संतोष लांडे आदींसह नागरिक उपस्थित होते.

उद्योजक मिलिंद कुलकर्णी म्हणाले की रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हीच सर्वात सुरक्षित आहे. कामगार वर्ग आपल्या कामावर येत असताना अपघाताच्या अनुचित घटना घडल्या आहेत त्यांच्या सुरक्षिततेसाठी आमदार संग्राम जगताप यांच्या कडे सिटी बस सेवेची मागणी केल्यानंतर त्यांनी तातडीने एमआयडीसीतील उद्योजकांचे प्रश्न मार्गी लावले आमदार संग्राम जगताप हे शहराला पुढे घेऊन जाणारे नेतृत्व मिळाले आहे. सर्वांना बरोबर घेऊन काम करत असल्यामुळे आपले शहर पुढे जात आहे.

प्रस्ताविक उद्योजक राजेंद्र कटारिया यांनी केले तर आभार प्रदर्शन उद्योजक सचिन पाटक यांनी मांडले. यावेळी माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आ. संग्राम जगताप आणि एमआयडीसीतील उद्योजकांनी सिटी बस सेवेतून प्रवास केला.

# जिल्ह्यातील पेन्शनर प्राथमिक शिक्षकांचा २५ सप्टेंबर रोजी नगर शहरात मेळावा

### संघटनेच्या राज्य अध्यक्षांसह जिल्ह्यातील दोन्ही खासदारांची उपस्थिती

नगर - जिल्हा प्राथमिक शिक्षक पेन्शनर असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील सर्व पेन्शनर शिक्षकांचा मेळावा बुधवारी (दि.२५) सकाळी ११ वाजता नगर शहरातील बुरुडगाव रोड वरील नक्षत्र लॉन्स येथे आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास संघटनेचे राज्य अध्यक्ष वसंतराव सबनिस यांच्या सह जिल्ह्यातील खा. निलेश लंके व खा. भाऊसाहेब वाकचौरे हे उपस्थित राहणार असल्याची माहिती असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष द. मा. ठुबे यांनी दिली.

खा. निलेश लंके हे पेंशनर संघटनेचे सभासद ज्ञानदेव लंके यांचे चिरंजीव आहेत. ते आमदार असताना प्राथमिक शिक्षकाचा मुलगा म्हणून त्यांनी सेवानिवृत्तांचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी मंत्रालय पातळीवर वेळोवेळी सहकार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे खा. भाऊसाहेब वाकचौरे हे देखील स्वतः प्राथमिक शिक्षक होते, नंतर गटविकास अधिकारी व नगर जिल्हा परिषदमध्ये उपमुख्यकार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. दोन्ही खासदार प्राथमिक शिक्षकांशी संबंधित असल्यामुळे नगर शहरात सेवानिवृत्त संघटनेच्या वतीने स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवारी होणाऱ्या कार्यक्रमात जिल्ह्यातील व राज्यातील सेवानिवृतांचे प्रश्न व समस्या मांडण्यासाठी संघटनेला चांगले व्यासपीठ मिळाले असून नियोजित मेळाव्यासाठी पेंशनर संघटनेचे राज्याध्यक्ष वसंतराव सबनिस, उपाध्यक्ष सदूभाऊ सोनवणे, धुळे पेंशनर संघटनेचे अध्यक्ष अनंतराव पाटील यांसह राज्यभरातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात दोन्ही खासदारांना संघटनेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या सर्व सेवानिवृत्तांचा खा. निलेश लंके यांच्यावतीने गौरव करण्यात येणार आहे. तरी स्नेहमेळाव्यास जिल्ह्यातील सर्व सेवानिवृतांनी मोठ्या संखेने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष द.मा. ठुबे, बन्शी उबाळे, भा. क. गोरे, सोन्याबापू वाकचौरे, भाऊसाहेब डेरे, द.म. शिंदे, अशोक बागूल, प.से. घुले, का.द.शिकारे, ज.प.काळे, शशिकांत इथापे, सु.पा. वांढेकर, विनायक कोल्हे, बापूसाहेब कर्पे, महादेव सरोदे, पोपट भुते, श्री. पू.कुलकर्णी, प्रतापराव देवरे, लतिका घुले, मंदाकिनी बाबर, नगर तालुकाध्यक्ष सूर्यभान काळे, बबन कुलट तसेच सर्व तालुका अध्यक्ष व जिल्हा कार्यकारणीने केले आहे.

# औषधांचा पुरवठा न करता व्यावसायिकाची सुमारे ११ लाख २९ हजारांची फसवणूक

नगर - शक्ती वर्धक औषधांचा पुरवठा न करता एका व्यावसायिकाची ११ लाख २९ हजार ९०० रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. रामचंद्र जनार्धन बाबर (वय ४६, रा. माधवबाग, आलमगीर, नागरदेवळे, ता. नगर) असे फसवणूक झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे.

दरम्यान, त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राज ठाकुर (पूर्ण नाव नाही, रा. चित्तोडीयानगर, कामशेत, ता. लोणावळा, जि. पुणे) याच्याविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना १९ जून २०२४ रोजीच्या पूर्वी सुमारे सात ते आठ दिवस अगोदर फिर्यादी बाबर यांच्या दुकानावर माधवबाग, आलमगीर येथे घडली आहे. रामचंद्र बाबर यांचे माधवबाग, आलमगीर येथे दुकान आहे. दि.१९ जून रोजीच्या पूर्वी सुमारे सात ते आठ दिवस अगोदर राज ठाकुर हा बाबर यांच्या दुकानावर आला होता. तो बाबर यांना म्हणाला, 'तुम्ही तुमच्या दुकानात मी दिलेले शक्ती वर्धक औषधांची विक्री करा, त्यात तुम्हाला अधिक नफा मिळेल' असे म्हणून बाबर यांना अधिक नफा मिळून देण्याचे आमिष दाखविले व त्यांचा विश्वास संपादन केला. ठाकुरने बाबर यांच्याकडून फोन पे व आरटीजीएसव्दारे ११ लाख २९ हजार ९०० रूपये घेतले.

दरम्यान, ठाकुरने बाबर यांना कोणतेही शक्ती वर्धक औषधांचा पुरवठा केला नाही. पैसे परत मागितले असता बदनामी करण्याची धमकी दिली. आपली फसवणूक झाल्याचे बाबर यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार अर्ज दाखल केला.

पोलिसांनी अर्ज चौकशी करून रविवारी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार डी. पी. शिंदे करत आहेत.

महापालिकेतील कर्मचारी

## दत्तात्रय कोतकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - केडगाव येथील रहिवासी दत्तात्रय गेणू कोतकर (वय ३९) यांचे २४ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. ते अहमदनगर महानगरपालिकेमध्ये कर्मचारी होते.

त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## सौ. मंगलबाई कोठारी यांचे आकस्मिक निधन



नगर - बोरीवली येथील रहिवासी सौ. मंगल कोठारी (वय ७३) यांचे राहत्या घरी २० सप्टेंबर रोजी आकस्मिक निधन झाले.

नगर येथील फौजदारी वकील राजेश कोठारी व पुणे येथील चार्टर्ड अकौंटंट सुभाष कोठारी यांच्या वहिनी तर सोनई येथील महावीर ज्वेलर्सचे अजित व जवाहर चंगेडे यांच्या भगिनी होत. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या.

त्यांच्या मागे पती, २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मुंबई उच्च न्यायालय येथील ज्येष्ठ विधीज्ञ बॅरिस्टर चंपालाल मोहनलाल कोठारी (वांबोरीकर) यांच्या त्या पत्नी होत.

## नरेंद्र चव्हाण यांचे हदयविकाराने निधन



श्रीरामपूर - श्रीरामपूर न.प.आरोग्य विभागाचे कर्मचारी नरेंद्र अशोक चव्हाण (वय ३२) यांचे ऑनड्युटी श्रीरामपूर नगरपरिषद येथे हदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, बहिण, दोन मुली, भावजय असा परिवार आहे. घनशाम चव्हाण यांचे थोरले बंधू होत.

## शामजी बुंदेले यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर - जुने नगर तालुका पोलीस स्टेशन जवळील शामजी हिरामण बुंदेले (वय ६९) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते नगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये गेले दीड महिन्यापासून उपचार घेत होते. उपचार सुरु असताना त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात ३ भाऊ, पत्नी, २ मुले, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा शांत व मनमिळावू स्वभाव होता. त्यांना भजन, किर्तन व समाजकार्याची आवड होती.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# शेअर बाजार सलग चौथ्या दिवशी सर्वकालीन उच्चांकी पातळीवर

### सेन्सेक्सने केला ८५ हजारांचा विक्रमी टप्पा पार, निफ्टीनंही गाठला उच्चांक

मुंबई - शेअर बाजारात मंगळवारी (दि.२४) सकाळच्या सत्रातले व्यवहार सुरू होताच गुंतवणूकदारांमध्ये उत्साह संचारला. आजतागायत पहिल्यांदाच सेन्सेक्सने ८५ हजारांचा टप्पा ओलांडला आहे. सकाळच्या सत्रात सेन्सेक्सनं ८५,०४३.४४ अंकांपर्यंत उसळी घेतली. गुंतवणूकदारांचा या पहिल्या उसळीमध्येच कोट्यवधींचा फायदा झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे मुंबई शेअर बाजारात मंगळवारची सकाळ गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढवणारी ठरली.

सकाली १० च्या सुमारास सेन्सेक्सनं ८५ हजारांचा टप्पा ओलांडला. अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह बँकेनं व्याजदरांमध्ये तब्बल ५० पॉइंटने घट केल्याचा परिणाम मुंबई शेअर बाजारात पाहायला मिळत असल्याचं जाणकारांचं मत आहे.दरम्यान, सेन्सेक्स प्रमाणेच निफ्टीनंही विक्रमी कामगिरीची नोंद केली आहे. निफ्टीनं आजपर्यंतची सर्वोच्च पातळी गाठत २५,९७८.९० अंकांची नोंद केली आहे.

अमेरिकन फेडरल बँकेकडून व्याजदरांमध्ये कपात केल्यापासून भारतीय शेअर बाजारात सकारात्मक वातावरण पाहायला मिळत आहे. १८ सप्टेंबर रोजी फेडरल बँकेनं ०.५ टक्क्यांनी व्याजदरांमध्ये कपात केली. २०२० च्या पहिल्या तिमाहीनंतर गेल्या चार वर्षांत पहिल्यांदाच अमेरिकेच्या फेडरल बँकेकडून व्याजदरांमध्ये कपात करण्यात आली आहे.

# दिव्यांग बांधवांच्या विविध प्रश्नांवर २५ सप्टेंबरला मंत्रालयावर आंदोलन



नगर - दिव्यांगांच्या विविध प्रश्नावर प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने बुधवारी (दि.२५ सप्टेंबर) मुंबई मंत्रालयावर आंदोलन होणार आहे. प्रहार दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना सहभागी होण्याचे आवाहन प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे, उत्तर जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे, महिला अध्यक्षा लक्ष्मीताई देशमुख, उत्तर जिल्हा संपर्कप्रमुख पांडुरंग कासार, जिल्हा सल्लागार सलीमभाई शेख, दक्षिण जिल्हा संपर्कप्रमुख गणेश हनवते यांनी केले आहे.

दिव्यांगांना सहा हजार रुपये मानधन मिळावे, घरकुल मिळावे, दिव्यांगांची कर्जमाफी व्हावी, दिव्यांगांना व्यवसायासाठी गाळा आणि जागा मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन केले जाणार आहे. मुंबई मंत्रालयाच्या मुख्य गेटवर सकाळी ११ वाजता आंदोलनाला सुरुवात होणार आहे. राज्यातील संघटनेचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, अंध, मूकबधीर, दिव्यांगांनी आपापल्या पद्धतीने मिळेल त्या वाहनाने मुंबईच्या आंदोलनात सहभागी होण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दिव्यांगांच्या कल्याण व पुनर्वसनासाठी हे आंदोलन असून, मोठ्या संख्येने या आंदोलनात उतरण्याचे सांगण्यात आले आहे.

## पारनेरचे माजी नगराध्यक्ष विजय औटी यांना जामीन

नगर - खा. निलेश लंके यांचे जवळचे सहकारी ॲड. राहुल झावरे यांच्यावरील हल्ला प्रकरणातील आरोपी पारनेरचे माजी नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी यांना जिल्हा सत्र न्यायालयाने सोमवारी (दि.२३) जामीन मंजूर केला आहे. औटी हे सुमारे साडे तीन महिन्यांपेक्षा जास्त काळापासून कारागृहात होते.

पारनेरच्या आंबेडकर चौकात ६ जून रोजी ही मारहाणीची घटना घडली होती. या प्रकरणी विजय सदाशिव औटी, नंदू सदाशिव औटी, प्रितेश पानमंद यांच्यासह २५ जणांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल झाला होता. राहुल झावरे यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर पारनेर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत विजय औटी, नंदू औटी, प्रितेश पानमंद आणि मंगेश कावरे यांना अटक केलेली होती. तेव्हा पासून ते कारागृहात होते. विजय औटी यांनी ॲड.अविनाश लांडे यांच्या मार्फत जिल्हा सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर सरकार पक्ष व अर्जदार यांच्या वतीने युक्तिवाद झाला. त्यानंतर जिल्हा सत्र न्यायालयाने सोमवारी विजय औटी यांना जामीन मंजूर केला आहे.

# हलगी, तुतारी व भांड्यांच्या निनादात महिला बांधकाम कामगारांचा आक्रोश

### महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या चुकीच्या धोरणाचा निषेध, ५ हजार रुपये महिना व दिवाळी बोनस देण्याची मागणी



हलगी, तुतारी व भांड्यांच्या निनादात महिला बांधकाम कामगारांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेला आक्रोश मोर्चा

नगर - महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या चुकीच्या धोरणाच्या निषेधार्थ व योजनांचा लाभ मिळत नसल्याने कष्टकरी महिला बांधकाम कामगारांनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर सोमवारी (दि.२३ सप्टेंबर) रिकामे भांडे वाजवून आक्रोश आंदोलन केले. लोकशाही बांधकाम कामगार व इतर कामगार संघटनेच्या वतीने करण्यात आलेल्या या आंदोलनात कडाडलेल्या हलगीच्या निनादात महिलांनी जोरदार घोषणाबाजी केली. तर तुतारी वाजवून बांधकाम कामगारांच्या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

महिला बांधकाम कामगारांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारात ठिय्या दिल्याने संपूर्ण रस्ता आंदोलक महिलांनी व्यापला होता. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकर भैलुमे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात महतिकुमार दोशी, निसार शेख, वैभव सोनवणे, आदेश साळवे, संगीता बोखारे, लक्ष्मी लवटे, दिपाली सरोदे, आसमा शेख, आशा माने, राणी घोडके, मंगल पाखरे, कांतीलाल भिसे, राहुल अडसूळ, रियाज तांबोळी, समीना सय्यद, सुनील जाधव, सुनिता सरोदे, स्वप्निल जाधव, विशाल खराडे, शाहिन शेख, पुनम समुद्र, राहुल अडसूळ, शोभा येडे, मालन पवार, अश्विनी वांकडे, साधना साळवे, राणी जाधव आदींसह विविध समाजातील महिला कामगार सहभागी झाले होते.

लाडकी बहीण योजनेतून महिलांचा बराच फायदा होणार आहे. परंतु ज्या बांधकाम व इतर कष्टकरी कामगार वर्गातील महिलांना या महागाईच्या काळात दीड हजार रुपयांचा फायदा होणार नाही. हजारो कोटी रुपये कामगार मंडळाकडे असून, तो पैसा नोंदणी महिला कामगारांना मिळाल्यास त्यांना जीवन जगणे सुसह्य होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शंकर भैलुमे म्हणाले की, कष्टकरी महिलांवर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ अन्याय करत आहे. कष्टकरी बहीण उपाशी असून, शासनाने त्यांच्याकडे लक्ष द्यावे. कोट्यावधी पैसे असून, देखील त्याचा लाभ कामगार वर्गाला दिला जात नाही. पूर्वी कामगारांना जेवण दिले जायचे, मात्र त्यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याने ती योजना बंद करुन कामगारांना उपाशी ठेवण्यात आले आहे. कामगार वर्ग उपाशी असल्याने त्यांना रिकामे डबे, ताट वाजवण्याची वेळ आली आहे. शासनाच्या वतीने दिले जाणारे लाभ कामगारांपर्यंत पोहोचत नाही. कामगरांचा दिवाळी बोनसही बंद करण्यात आला असून, त्यांना महागाईच्या काळात जीवन जगणे अवघड बनले असल्याचे त्यांनी सांगितले. बांधकाम कामगारांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास हा मोर्चा मुंबई येथील कामगार कल्याणकारी मंडळाच्या कार्यालयावर धडकणार आहे. तर महिला कामगार अधिकाऱ्यांना बांगड्यांचा आहेर देणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

महाराष्ट्र कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने महिला कामगारांना ५ हजार रुपये महिना कामगार कल्याणकारी मंडळाकडून मिळावा, नोंदीत कामगारांना दिवाळीसाठी ५ हजार रुपये बोनस म्हणून दिले जायचे. परंतु ते तीन ते चार वर्षापासून बंद करण्यात आले असून, यावर्षी १० हजार रुपये बोनस देण्यात यावा. कामगार कल्याणकारी मंडळकडून तालुकास्तरावर उभारण्यात आलेल्या बीओसी सेंटरवर शासकीय अधिकारी नियुक्त करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांनी स्विकारले.

# गृहिणी

## आरोग्य

### प्रदूषण आणि व्यसनांपासून राहा दूर

व्यसनामुळे आहारातील पोषकद्रव्यांचे आणि ऑक्सिजनचे शोषण होण्यास अडचणी निर्माण होतात. व्यसन वाढल्यास आपणा जास्त वयस्कर दिसू लागतो हे आता सिद्ध झाले आहे. म्हणूनच, धूम्रपान, तंबाखू सेवन, मिश्री लावणे या व्यसनांपासून दूर रहावे. हे टाळण्यासाठी आहारविहारविषयक नियमांचे अवश्य पालन करावे.

## पाककला

### खोबऱ्याच्या साटोऱ्या

**साहित्य :** चार वाट्या कणीक, दोन वाट्या साखर, एक नारळ, अर्धी वाटी चिरलेला गूळ, आठ-दहा वेलदोडे. तळण्याकरिता तूप. पाव वाटी तेल.

**कृती :** साडेतीन वाट्या पाण्यात अर्धी वाटी गूळ घालून व तेल घालून ते पाणी उकळावे. नंतर त्यात कणीक घालून चांगले ढवळावे व दोन वाफा येऊ द्याव्यात. साखर व नारळाचे खोवलेले खोबरे एकत्र करून सारण तयार करावे.

शिजविलेल्या कणकेच्या लहान लहान गोळ्या करून त्यात वरील सारण भरून पुरणपोळीप्रमाणे पण जाड पोळ्या लाटाव्यात. साधारणपणे मोठ्या पुरीइतका आकार असावा. नंतर मंद विस्तवावर तुपात तांबूस होईपर्यंत तळून काढाव्यात.

## वास्तू

### देवासमोर करा मंत्रोच्चारण

* रोज देवाजवळ काही विशिष्ट मंत्रांचे अथवा स्तोत्रांचे पठण उच्चारण योग्य ध्वनीपातळीत स्पष्ट उच्चारांमध्ये करणे फार चांगले असते.

* स्वयंपाकघर व देवघर या दोघांमधील पावित्र्य योग्य प्रकारे राखले जाईल अशी व्यवस्था करावी. या ठिकाणी देवघरास एखादे पार्टीशन करून स्वतंत्र व्यवस्था करावी. असल्यास दोन्हींमधील समतोल राखावा.

## सल्ला

कोणत्याही प्रकारच्या वड्या करताना, वड्यांचा गोळा चिक्कीवर जातो, असे वाटल्यास, खाली उतरवून त्यात पिठीसाखर मिसळावी. चांगल्या वड्या होतात.

## सौंदर्य

टिश्यू पेपर संपूर्ण चेहऱ्यावर प्रेस करावा. याने चेहऱ्यावरील घाम शोषून त्वचा मऊ होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २५ सप्टेंबर २०२४

**अविधवा नवमी, नवमी श्राद्ध, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, आर्द्रा २२।२४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आजचा आपला दिवस मित्र आणि सामाजिक कार्ये यांच्यामागे धावपळ करण्यात जाईल.

**वृषभ** : पदोन्नतीचा योग आहे. कार्यलयात अधिकाऱ्यांकडून सहकार्य मिळेल.

**मिथुन** : आपल्याला आज प्रतिकूल दिवस आहे. मानसिक व्यग्रता, शारीरिक शिथिलता अनुभवास येईल.

**कर्क** : वैचारिक नकारात्मकता मनात असल्याने दिवसभर अस्वस्थ राहाल. म्हणून तो दूर ठेवा.

**सिंह** : बेबनाव होईल, त्यामुळे क्लेश होतील.

**कन्या** : व्यवसाय धंद्यात आज यश मिळण्याची शक्यता अधिक आहे.

**तूळ** : तुमची वैचारिक आणि मधुर वाणी लोकांना प्रभावित करेल.

**वृश्चिक** : मित्रपरिवाराशी सावधपणाने वागा असे श्रीगणेश सांगतात.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर तुम्ही मात कराल. शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य आज चांगले राहील. वाहने काळजीपूर्वक चालवा.

**मकर** : आजचा दिवस मिश्रफल देणारा आहे. कुटुंबातील लोकांबरोबर गैरसमजातून मतभेदाचे प्रसंग घडतील व मन दुःखी होईल.

**कुंभ** : आजचा दिवस तुम्हाला आर्थिकदृष्ट्या लाभदायी आहे.

**मीन** : स्थावर संपत्ती व कोर्ट-कचेरी यांच्या झंझटमध्ये आज पडू नका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### रिपोर्ट

पुढारी :- डॉक्टर, माझा मेडिकल रिपोर्ट जरा मला समजेल असा माझ्या भाषेत सांगा.

डॉक्टर :- 'तर मग ऐका, रिपोर्ट प्रमाणे आपला रक्तदाब घोटाळ्याकडे वाढत चालला आहे. फुफ्फुसे खोटी आश्वासने देत आहेत. तर हृदय राजीनामा देण्याच्या मार्गावर आहे. आत्मा पक्षांतर करणार आहे.'

## ...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* कमी उंची मोजण्यासाठी हे उपकरण वापरतात – व्हर्निअर कॉलीपर
* समुद्राची खोली मोजण्यासाठी हे उपकरण वापरतात – सोनार तंत्रज्ञान
* मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ महाराष्ट्रात येथे आहे – छत्रपती संभाजीनगर
* भारताचा सर्वोच्च क्रीडा पुरस्कार हा आहे – राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार

**संदर्भ – 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०१७ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | |
| ६ | | ■ | ७ | | | | ■ |
| ■ | ■ | ८ | | ■ | ९ | | १० |
| ११ | १२ | | | ■ | ■ | १३ | |
| १४ | | ■ | १५ | १६ | १७ | ■ | |
| ■ | | ■ | १८ | | | | ■ |
| १९ | | ■ | | ■ | | ■ | २० |
| | ■ | २१ | ■ | २२ | | | |

**शब्दगंध क्र. ७०१६ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | हा | त्मा | गां | धी | ■ | च | व |
| द | ल | ■ | डी | ■ | स | मू | ळ |
| त | ■ | अ | व | य | व | ■ | व |
| नी | र | ज | ■ | कृ | ती | ■ | ळ |
| स | ज | ग | ■ | त | म | ■ | ■ |
| ■ | नी | र | भ्र | ■ | त्स | ■ | सु |
| व | श | ■ | ता | ■ | र | ज | ब |
| डा | ■ | आ | र | सा | ■ | या | क |

**आडवे शब्द :-** १) धार्मिक शिक्षण देणारी मुस्लिमांची उर्दू शाळा ४) पाच शेरांचे पूर्वीच्या काळातील एक माप ६) खालचा भाग; बूड ७) गणपतीचे एक नाव ८) प्रधान; पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री यांचे सहकारी ९) प्रश्न ११) आदरयुक्त दरारा १३) विष्णुपत्नी; लक्ष्मी १४) बाजार; मंडई; मार्केट १५) पृथ्वीच्या वातावरणाबाहेरील निर्वात पोकळी; अंतराळ; आकाशतत्त्व १८) सवड; उसंत १९) मेंदूवर परिणाम होऊन विचित्र वागणारा २१) कित्येक; कैक २२) एक दुचाकी वाहन

**उभे शब्द :-** १) निवडणुकीत याचे दान करतात २) पान; अर्धा भाग; सैन्य ३) स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या; महात्मा फुले यांच्या पत्नी ४) एक पक्वान्न; खीर ५) नाजूक; सुकुमार; कोमल ८) हळू; धिमा; सावकाश १०) तांड्यावर वस्ती करून राहणारी एक जमात ११) रावणाच्या तोंडांची संख्या १२) वाटप; वितरण (विशेषत: टपालाचे) १६) पापुद्रा; स्तर १७) रसाने भरलेले; रसाळ १९) गावाचे प्रवेशद्वार २०) वर फेकलेली वस्तू वरच्यावर हातात धरणे; कॅच

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मनाची शांतता म्हणजे सुखी जीवन होय.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### आपल्याला झोपेची आवश्यकता आहे का?

प्रत्येक यंत्राला विश्रांती लागते. एखादी पत्र्याची पट्टी सतत मागंपुढं वाकवली की तुटते, याला कारण म्हणजे त्या पत्र्यात शीण निर्माण झाला असे म्हटले जाते. मानवी शरीरही सतत कामाने असे थकते. हा शीण वाजवीपेक्षा जास्त झाला की, आपण जांभया देऊ लागतो. हा आपला ऑक्सिजन जास्त प्रमाणात मिळवायचा प्रयत्न असतो. अर्थात हे म्हणजे दमलेल्या बैलाला फटके मारायचा प्रकार झाला.

आपल्या पेशींमध्ये थकवा निर्माण झाला की, त्याची नोंद मेंदूत घेतली जाते. यामुळे मेंदूतून काही रसायने दमल्याचा संदेश झोपकेंद्राकडे पोहोचवतात. या झोपकेंद्राकडे हा संदेश पोहोचला की, हळूहळू विचार थंडावतात व श्रमलेले अवयव आराम करू लागतात. यालाच आपण झोप म्हणतो. झोपेत आपल्या श्वसनक्रियेत बाधा येत नाही. थोडे मंद गतीने पण हृदयाचे काम चालूच राहते. तापमान थोडे कमी होते, रक्तातल्या पेशी जागेपणी साठलेल्या अपायकारक पदार्थांचा निचरा करण्यात मग्न असतात. अर्थात आपल्यावर मानसिक दडपण असेल, तर अशी शांत झोप मात्र शक्य होत नाही हेही तितकेच खरे.

झोपेत आपण हालचाली करतोच. या हालचाली न करता झोप लागणारा माणूस विरळाच. यात कूस बदलणे ही प्रमुख प्रक्रिया, शिवाय कान खाजविणे, पाय हलवणे, हाताची घडी करणे हेही आपल्याकडून नकळत घडत राहते.

### अडकलेला नांगर

द्वापर युगातील ही गोष्ट आहे. मथुरेत एक माणूस राहायचा. त्याची अशी इच्छा होती की, आपण एकदा तरी गोकुळला जाऊन भगवान श्रीकृष्णाचे दर्शन घ्यावे. त्यांच्या लीला पाहाव्यात. पण तो संसारात पुरता अडकला होता. त्यामुळे त्याची इच्छा असूनही त्याला जाता येईना. शिवाय दुसरी अडचण अशी होती की, गोकुळला जाण्यासाठी यमुना नदी पार करावी लागत असे, त्यासाठी रात्रभर होडीतून जावे लागे.

त्या नागरिकाने एकदा मनावर घेतले की, आपण गोकुळला जायचेच! म्हणून त्याने एक होडीही भाड्याने घेतली. दिवसभर काम करून रात्री तो गोकुळला जायला निघाला आणि नदीवर येऊन होडीत बसला. होडी वल्हवत तो निघाला. प्रारंभी हेलकावत जाणारी होडी काही वेळाने संथ झाली. वल्हवल्यामुळे पाणी मात्र मागे जात राहिले. तो नागरिक सर्व शक्तीनिशी होडी वल्हवत होता. अनेक तास वल्हे मारल्यानंतर तो थकला. आजूबाजूला पाणी होते. आता सकाळी बघू असा विचार करून तो झोपी गेला.

पहाटे त्याला जाग आली तेव्हा तो चकितच झाला. त्याची होडी मथुरेच्या नदीच्या काठावरच होती, असे कसे झाले. असा त्याला प्रश्न पडला. सकाळी होडीवाला आला तेव्हा उलगडा झाला की, त्याने होडीचा नांगर काढलाच नव्हता. त्यामुळे फक्त तो नदीच्या पात्रात पाणी वल्हवित राहिला.

तात्पर्य : संसाररूपी सागरात मोहाचा नांगर अडकलेला असतो. मोह टाळून परमेश्वराची मनापासून भक्ती केली तरच खऱ्या अर्थाने माणसाला मोक्ष मिळू शकतो.

## जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



ऊर्जा के इस क्षेत्र में हम संतों और रहस्यवादियों को प्रायः विशेषज्ञ नहीं मानते हैं, पर इसे समझने के लिए हमें उनकी ओर मुड़ना होगा, ताकि हम अपने अंतर में स्थित इस अनंत स्त्रोत पर आधिपत्य प्राप्त कर सके। वैज्ञानिकों की भांति संत भी संसार की प्रकृति और उद्गम के बारे में तथा इससे हमारे संबंध के बारे में कुछ आधारतत्व बनाते हैं। वे बताते हैं कि सम्पूर्ण जीवन एक ही ऊर्जा की अभिव्यक्ति है और वे हमें इस गुप्त और अनंत शक्ति को प्राप्त करने के साधन के बारे में बताते हैं। आधुनिक विज्ञान, युगों-युगों से संतों-महात्माओं द्वारा बताए गए इन तथ्यों को अब सिद्ध करने लगा है।

संपूर्ण सृष्टि को बनाने वाली शक्ति की खोज में, अन्वेषकों को नए प्रयोगात्मक तरीकों को खोजना पड़ा, क्योंकि वे अवर- आण्विक (सूक्ष्म) तथ्यों की खोज कर रहे हैं, जो कि हमारी ज्ञानेन्द्रियों के द्वारा अनुभव नहीं किये जा सकते। और वे जिस भाषा का, इन खोजों का वर्णन करने के लिए प्रयोग करते हैं, वह कभी-कभी विज्ञान और रहस्यवाद के बीच की रेखा को अस्पष्ट सा कर देती है। वे कहते हैं कि वस्तुओं में भिन्नता तथा पृथकता प्रतीत होने के बावजूद एक शक्तिशाली समानता है। नोबेल पुरस्कार विजेता विज्ञानिकों ने एकीकृत सिद्धांत की परिकल्पना की है, जिससे हमें पता चलता है कि जीवन की उत्पत्ति प्रकाश से हुई तथा सुदूर भविष्य में इसका अंत भी प्रकाश में ही होगा। सारे जीवन की उत्पत्ति के पीछे एक शाश्वत (प्राचीन) ऊर्जा या शक्ति की खोज, हमें ज्ञानेन्द्रियों के क्षेत्र से परे ले जाती है। इसी स्थान से आंतरिक विज्ञान, जिसमें संतों ने विशिष्टता प्राप्त की आरम्भ होता है। संतों और महात्माओं ने हमें अनंत काल से यही सिखाया है कि प्रभु का अपनी परम् अवस्था में न तो कोई नाम है और न ही कोई स्वरुप । वह तो कल्पना और वर्णन से परे की बात है। नि:संदेह हम उस चरम् सत्य का केवल आलंकारिक भाषा में वर्णन कर सकते हैं।

हम उसको परमानन्द चेतनता का अनंत सागर कह सकते हैं। संत, महात्मा हमें बताते हैं कि प्रभु, जो एक था उसने अनेक होने की ठानी। इस संकल्प से एक हिलोर उठी जो कि प्रभु की ज्योति और श्रुति के रूप में प्रकट हुई ये दोनों ही स्वरुप संयुक्त रुप से बाइबिल में पावन शब्द कहलाये प्रारंभ में शब्द था और यह शब्द प्रभु के साथ था और शब्द ही प्रभु था। मुस्लिम धर्म-ग्रंथों में इसे क़लमा हिन्दुओं की धार्मिक पुस्तकों में इसको नाद, शब्द और नाम बौद्ध धर्म ग्रंथों में इसको सोनोरस लाइट, पारसी धर्म-ग्रंथों में इसे स्त्रोशा, चीनी धर्म-पुस्तकों में इनको ताओ, प्राचीन यूनानी दार्शनिकों द्वारा इसे लोगोस और सूफियों ने इसे बाँग-ए-आसमानी कहा है संसार भर की धर्म-पुस्तकों में प्रकाश और ध्वनि के उद्धरण भरे पड़े हैं। वास्तव में अगर हम इसे ध्यान में रखें तो हमें पता लगेगा कि विभिन्न धर्मों के पूजा-स्थलों में ध्वनि और प्रकाश का सांकेतिक रुप में प्रयोग होता है। शब्द या नाम प्रभु की सबसे सीधी अभिव्यक्ति है और यह पूर्ण रूप से आध्यात्मिक तत्व है। जब इसका अवतरण हुआ तो इससे सृष्टि के अनेक मंडल अस्तित्व में आये – महाकारण मंडल, कारण मंडल, सूक्ष्म मंडल तथा भौतिक मंडल। इसने मानव और अन्य सभी योनियों को भी बनाया।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

इस संसार में जो कुछ भी हो रहा है, उसके पीछे कोई न कोई बल है। शारीरिक बल, भौतिक बल, यांत्रिक बल, बाहु बल, धन बल आदि आदि। ये बल यथा शक्ति हैं। एक सूक्ष्म बल जो दिखाई नहीं देता परन्तु सब भौतिक हलचल के पीछे कार्य कर रहा है। वह है चुम्बकीय बल जिसे आकर्षण का बल भी कहते हैं। एक है आत्मिक बल । यह भी सूक्ष्म बल है। तीसरा बल है परमात्मा का बल जिसे अदृश्य बल, दिव्य बल या कुदरती बल आदि के नाम से जाना जाता है ये बल भी सूक्ष्म है। इसे स्थूल आँखों से नहीं देखा जा सकता। असल में तीन ही बल हैं जो अदृश्य हैं परन्तु असीमित हैं। चुम्बकीय बल, आत्मिक बल और परमात्म बल चुम्बकीय बल और आत्म बल पर बहुत खोज हो चुकी है। परमात्म बल के बारे सारा संसार जानता है। परंतु इसके बारे सभी के अनुभव अलग-अलग हैं। भौतिक और अभौतिक सुख भोगने वाली आत्मा ही है। अगर आत्मा ईश्वरीय बल जिसे दिव्य बल या प्यार का बल कहते हैं उसके बारे जान जाए तो महान क्रांति हो सकती है। चुम्बकीय बल के नियम अटल हैं। ऐसे ही दिव्य बल / प्यार के बल के नियम भी अटल होते हैं। दिव्य बल प्रत्येक व्यक्ति और प्राणी पर कार्य करता है। इसी बल के कारण मृत्यु अवश्य होती है चाहे वह कोई भी हो। हमें हर रोज इस दिव्य बल के बारे कुछ न कुछ नया सीखना चाहिए और उसका लाभ उठाना चाहिए।

दिव्य बल अर्थात् आपके अंदर जो भावनाएं होती हैं वही आपके आने वाले कल को आकर्षित करती है। चिंता अधिक चिंता को खींचती है। तनाव अधिक तनाव को खींचता है। दुख अधिक दुख को खींचता है। असंतोष अधिक असंतोष को खींचता है। प्रसन्नता अधिक प्रसन्नता को खींचती है। आनंद अधिक आनंद को खींचता है। शांति अधिक शांति को खींचती है। दयालुता अधिक दयालुता को खींचती है। प्रेम अधिक प्रेम को खींचता है। आपका काम अंदरूनी है अपने संसार को बदलने के लिए सिर्फ अपने अंदर के अहसास को बदल दो।

प्रत्येक मनुष्य जन्म से लेकर मृत्यु तक कुछ न कुछ बोलता रहता है। किसी न किसी भावना से प्रभावित होता रहता है। नवजात बच्चे की एक ही भावना रहती है कि उसकी मम्मी उसे समय पर दूध पानी देती रहे और उसकी सुविधाओं का ध्यान रखे। अगर आप भावना रखते हैं कि अपने बॉस को, निमित शिक्षक को नहीं झेल सकते तो यह आपकी नकारात्मक भावना को व्यक्त करता है। आपके संबंध बॉस के साथ कभी अच्छे नहीं बनेंगे और ऐसे सभी लोगों के साथ नहीं बनेंगे जिसके बारे आप ऐसा सोच रहे हैं। यदि आप सोचते हैं कि मेरे घर के लोग, समूह के लोग, ऑफिस के लोग बहुत अच्छे हैं तो आप सकारात्मक भावना भेज रहे हैं। इसका परिणाम यह होगा कि आप जहाँ जाओगे आप को सभी प्यार करेंगे। जितनी अच्छी भावना होगी उतना ही प्रेम करेंगे। जितना खुश होंगे उतना ही प्रेम करेंगे। बदले में आपको उतना ही प्रेम मिलेगा। आज जब भी निराश होते हैं तो यह बुरी भावना है। इसका परिणाम आपको उदासी मिलेगी। आप जितना अच्छा महसूस करेंगे आपके जीवन में अच्छा घटित होगा। जितना खुश रहेंगे, सुखी रहेंगे, रोमांचित रहेंगे, उत्साही रहेंगे, ये सब अच्छी भावनाएं हैं। इनका परिणाम आपका जीवन बहुत श्रेष्ठ बनेगा। अगर आप चिढ़ते हैं तो यह नकारात्मक भावना है। आपको चिढ़ाने वाली परिस्थितियां मिलेगी आपको मच्छर काटेगा, कुत्ते भौंकेंगे, बच्चे शोर करेंगे। लोग बिना मतलब हॉर्न बजाएंगे जिससे आपको चिढ़ होगी। अगर आप उदास हैं तो ऐसी ही परिस्थितियाँ मिलेगी। अगर आप खुश हैं तो खुशी की परिस्थितियाँ मिलेगी। सभी व्यक्ति ज्यादातर नकारात्मक विचारों में रहते हैं इसलिए उन्हें सारा दिन नकारात्मकता मिलती ।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

त्यामुळे शरीरामध्ये फ्री रॅडीकल्सची निर्मिती होते. शरीरातील पेशींना हानी पोहोचते व झीज होऊ लागते. यालाच ऑक्सिडेशन असे म्हणतात. व्यसनामुळेदेखील आहारातील पोषकद्रव्यांचे आणि ऑक्सिजनचे शोषण होण्यास अडचणी निर्माण होतात. व्यसन वाढल्यास जास्त वयस्कर दिसू लागतो हे आता सिद्ध झाले आहे. म्हणूनच, धूम्रपान, तंबाखू सेवन, मिश्री लावणे या व्यसनांपासून दूर रहावे. प्रदूषण आणि व्यसन यांमुळे उच्च रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह, संधिवात, त्वचा सुरकुतणे, लवकर वार्धक्य येणे, कर्करोग हे विकार दिसून येतात. हे टाळण्यासाठी आहारविहारविषयक नियमांचे अवश्य पालन करावे.

**९) कला व छंद जोपासा –**

या वयापर्यंत आपण नोकरी, व्यवसाय तसेच संसारातील जबाबदाऱ्यांमध्ये बऱ्यापैकी स्थिर झालेलो असतो. आपल्यामधील कर्तृत्व सिद्ध करण्याच्या उद्देशाने काही स्त्रिया अति कष्ट व मानसिक ताणतणाव सहन करतात. रोजच्या कामामधून थोडा विरंगुळा हवा यासाठी काही छंद, कला जोपासणे गरजेचे असते. यामधून शरीर व मनाचे संतुलन होते. रोजच्या दैनंदिन चाकोरीबद्ध आयुष्याचा बऱ्याच जणींना कंटाळा येतो. एवढे दिवस नांगराला बैल जुंपल्याप्रमाणे बहुसंख्य स्त्रिया काम करत असते. परंतु चाळिशीमध्ये स्वत:चे मन रमेल, ज्या कलेमध्ये आनंद वाटेल असा एखादा छंद जोपासावा. तारुण्यात शिक्षणामुळे, घरच्या खोट्या प्रतिष्ठेमुळे, एखादीला गाणे म्हणणे, नृत्य करणे या गोष्टी करायला जमल्या नसतील, तर नक्कीच तुम्ही या वयात त्या गोष्टी करा. शरीरातील हार्मोन्सच्या असंतुलनामुळे चाळिशीमध्ये उगाचच उदास वाटणे, एकदम रडायला येणे, हताश झाल्यासारखे वाटणे, चिडचिड होणे, माणसांमध्ये असूनही एकटे असण्याची भावना निर्माण होणे ही लक्षणे दिसून येतात. असे होऊ नये म्हणून शरीर व मन कायम आनंदी व प्रफुल्लित ठेवणे गरजेचे आहे. मन आनंदी ठेवण्यासाठी छंद जोपासायला हवा. चित्र काढणे, कॉम्प्युटर शिकणे, इंग्लिश स्पिकिंगचा कोर्स करणे, चांगली पुस्तके वाचणे, वृद्धाश्रमांना भेट देऊन तेथील वृद्धांना मदत करणे, अनाथालयाला भेट देऊन तेथील मुलांना एखादी कला शिकवणे हे सर्व या वयात करू शकतो. मुले मोठी झाल्यामुळे स्वत:साठी थोडा वेळ मिळतो. तेव्हा स्वत:चा छंद जोपासावा.

**१०) हसणे ही एक कला आहे, ती आत्मसात करा –**

मानसिक ताण कमी करण्यासाठी खळखळून हसणे उत्तम होय. हसण्यामुळे चिंता आणि नैराश्य भावना कमी होते. चेहऱ्यावर काळजीने पडणाऱ्या आठ्या कमी होतात. इतरांशी संवाद साधताना नातेसंबध दृढ होतात. याकरिता सध्याच्या काळात हास्यक्लब सुरू झाले आहेत.

हास्य ही कला जोपासल्यामुळे शरीर व मन नेहमी आनंदी राहते. त्यामुळे तारुण्य टिकण्यास मदत होते.

**– डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# नगरमध्ये गहना डायमंड व गोल्ड ज्वेलरीचे एक्झिबिशन

## २७ ते २९ सप्टेंबर दरम्यान आयोजन, नामांकित ब्रॅण्डचा सहभाग



नगर – नवरात्र, दिवाळीचा सण नजीक आल्याने खास खरेदीची तयारी करण्यात येत आहे. नगरकरांची डायमंड, गोल्ड ज्वेलरी खरेदी संस्मरणीय ठरावी यासाठी २७ ते २९ सप्टेंबर या कालावधीत गहना डायमंड व गोल्ड ज्वेलरीचे एक्झिबिशन आयोजित करण्यात आले आहे. हॉटेल आयरिस येथे सकाळी १०.३० ते रात्री ८ यावेळेत एक्झिबिशन सर्वांसाठी खुले असेल.

राज्यातील तसेच देशातील नामांकित ब्रॅण्डचे दागिन्यांचे खास कलेक्शन नगरमध्येच उपलब्ध करून देण्यासाठी गहनाच्यावतीने दरवर्षी नगर शहरात एक्झिबिशन घेण्यात येते. यंदाही गोल्डस्मिथ्स, एनडब्ल्यूएस, साखरिया, अनमोल हे मोठे ब्रॅण्ड आपले खास कलेक्शन सादर करणार आहेत. यात डायमंड तसेच गोल्ड ज्वेलरीचे खास डिझाईन, एक्स्लुझिव्ह व्हरायटी उपलब्ध होईल. संपूर्ण विश्वासार्हता आणि शुध्दतेची हमी या ब्रॅण्डकडून दिली जाते. अनेकदा या ब्रॅण्डच्या खरेदीसाठी चोखंदळ नगरकर ग्राहक परगावी जातात. त्यांना त्यांच्याच शहरात एक्झिबिशनमुळे मनपसंत खरेदी निवांत करण्याची संधी मिळाली आहे.

अनमोल ज्वेलर्सचे सन २०२४ चे नवीनतम डायमंड, अँटिक कलेक्शन, गोल्ड कलेक्शन रेग्युलर तसेच वधूसाठीचे असणार आहे. पुण्यातील साखरिया ज्वेलर्स प्रथमच नगरमध्ये प्रदर्शनात सहभागी होत आहे. त्यांचे डायमंड, अँटिक गोल्ड, पोलकीचे खास कलेक्शन असणार आहे. एनडब्ल्यूएस ब्रॅण्डची खास मशीन मेड ज्वेलरी प्रदर्शनात असेल. २० हजारांपासून २ लाखापर्यंतचे खास दागिने यात असणार आहेत. त्यांचे बसरा पर्ल्स आणि डायमंड कलेक्शन विलोभनीय आहे. मुंबईतील गोल्डस्मिथ्स प्रथमच नगरमध्ये डायमंड व पोलिकीचे कलेक्शन उपलब्ध करून देत आहेत. वस्त्र प्रदर्शनात एक्स्लुझिव्ह घागरा चोली, डिझायनर साड्या, पोलकीचे खास कलेक्शन असणार आहे. एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणात दागिन्यांची व्हरायटी नगरमध्ये या प्रदर्शनातून सर्वांसाठी उपलब्ध झाली आहे. नगरकरांनी या संधीचा लाभ घेत मनाप्रमाणे दागिने खरेदी करावी.

# रोटरी ई क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथच्यावतीने शिक्षकांचा 'नेशन बिल्डर अॅवॉर्ड'ने सन्मान

## शिक्षकांना तणाव व्यवस्थापन, भावनिक सक्षमीकरण व पोस्को काद्याबद्दल मार्गदर्शन



रोटरी ई क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथच्यावतीने शिक्षकांचा नेशन बिल्डर अॅवॉडने सन्मानित करताना डॉ. सुरेश पठारे, अॅड. अभय राजे आदी.

नगर – रोटरी ई क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दहा शिक्षकांना रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ नेशन बिल्डर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. तर शिक्षकांना तणाव व्यवस्थापन, भावनिक सक्षमीकरण व पोक्सो काद्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

हॉटेल संजोग येथे सीएसआरडी महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेश पठारे व रोटरी लिटरसीचे डिस्ट्रिक्ट डायरेक्टर दादासाहेब करंजुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी रोटरी ई क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथच्या अध्यक्षा स्विटी पंजाबी, सचिव डॉ. बिंदू शिरसाठ, प्रकल्प समनवयक सविता चड्डा, जागृती ओबेरॉय, शीलू मक्कर आदींसह शिक्षक वर्ग उपस्थित होते.

अॅड. अभय राजे यांनी पोस्को कायदा आणि युवक संरक्षण धोरण यावर चर्चा करुन शिक्षकांना पोस्को कायद्याची व्याप्ती सांगितली. बबिता जग्गी यांनी शैक्षणिक क्षेत्रात काम करताना तणाव व्यवस्थापन आणि भावनिक सक्षमीकरण या विषयांवर मार्गदर्शन केले.

उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक क्षेत्रात समर्पित भावनेने उत्कृष्ट कार्य करणारे मनीषा बोर्डे, सुरेखा गर्जे, बाबासाहेब शिंदे, चंद्रकांत डाके, सुनील पंडित, प्रणव गांधी, क्रांती मुंडणकर, उमेश दोडेजा, लाजरस केदारी आणि महादेव राऊत यांना नेशन बिल्डर अवॉर्डने गौरविण्यात आले. गुणवंत विद्यार्थी घडविणे, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, कॅन्सर जागृती, स्किल डेव्हलपमेंट आदींसह शैक्षणिक, सामाजिक, कला व क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती.

या कार्यक्रमात महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे गौरव करणारे मनीषा बोर्डे यांच्या हस्तलेखनाच्या कॅलिग्राफीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. तसेच शिक्षकांसाठी यावेळी मनोरंजनात्मक उपक्रम घेण्यात आले. रोटरीच्या विविध सामाजिक उपक्रमात या शिक्षक वर्गाचा नेहमीच सहभाग मिळत असल्याबद्दल त्यांचे आभार माणून त्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# जीवदया ही जीन शासनची खरी प्रभावना : श्रुतमुनीजी महाराजा साहेब

## जैन मंदिरातर्फे सुभाष मुथा यांच्या हस्ते विविध गोशाळांना आर्थिक मदतीचे धनादेश प्रदान



कापडबाजार जैन मंदिरातर्फे अध्यक्ष सुभाष मुथा यांच्या हस्ते विविध गोशळांना आर्थिक मदतीचे धमादेश श्रुतमुनीजी म.सा. यांच्या प्रदान करताना. समवेत इतर पदाधिकारी.

नगर – अहिंसा परमो धर्म अशी शिकवण देणारे जीन शासन जीवदया व करूणा शिकवते. चातुर्मास व संवत्सरी पर्वानंतर याच जीवदयेतून गोमातेची सेवा करण्यासारखे पुण्य कर्म नाही. जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व त्यांचे सर्व सहकारी ट्रस्टी गोरक्षण व गोसंगोपनासाठी वेळोवेळी गोशाळांना आर्थिक मदत करीत असतात. हे धर्म कार्य त्यांना नेहमीच चांगले आशीर्वाद देईल.

जीन शासनची ही खरी प्रभावना असून जीवदयेचे हे कार्य त्यांना नेहमीच आनंदी, समाधानी ठेवेल. अशा कार्यामुळे समाजाला गोसेवेची प्रेरणा मिळून अधिकाधिक दानशूर मंडळी पुढे येऊन गोमातेच्या सेवेतून धर्म प्रभावना करतील असे आशीर्वाद चातुर्मासानिमित्त आनंदधाम येथे विराजमान शांत स्वभावी प्रखर वक्ता उपप्रवर्तक श्रुतमुनिजी महाराजा साहेब यांनी दिले.

पर्व पर्युषण आनंदी वातावरण, निर्विघ्नपणे आणि आराधना सहित पार पडल्यामुळे कापड बाजार जैन मंदिरात चातुर्मासानिमित्त विराजमान साध्वीजी भगवंत ऋजूप्रज्ञाश्रीजी म. सा. यांच्या प्रेरणेने जीवदयासाठी विविध गोरक्षण संस्थांना गायींच्या हिरव्या चाऱ्यासाठी आर्थिक मदतीचा धनादेश देण्यात आला.

आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराजा साहेब, शांत स्वभावी प्रखर वक्ता श्रुतमुनीजी महाराजा साहेब, सरळ स्वभावी आराधक आलोकऋषीजी महाराजा साहेब, तपस्वी साध्वीजी विनित दर्शनाजी म.सा. यांच्या निश्रामध्ये नगरमधील पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे उप व्यवस्थापक रमेश पितळे, अरूणोदय गोशाळेचे व्यवस्थापक संजय कटारिया, मिरी गोशाळेचे व्यवस्थापक, वर्धा (जि. नागपूर) व संगमनेर येथील सर्वोदय गोशाळेला जैन मंदिरचे अध्यक्ष सुभाष मुथा यांच्या हस्ते गायींच्या हिरव्या चाऱ्यासाठी आर्थिक मदतीचे धनादेश जैन मंदिर ट्रस्ट तर्फे देण्यात आले.

प्रास्ताविकात सुभाष मुथा म्हणाले, भगवान महावीर यांची शिकवण व साधू भगवंतांनी सांगितल्या प्रमाणे जीवदया हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. आताच्या काळात गोमातेचे संरक्षण आणि पालन करणे आवश्यक आहे. कारण आपल्या संस्कृतीत गायीला मातेचा दर्जा दिला आहे. गाय फक्त प्राणी नसून कामधेनू आहे. तिच्या अस्तित्वामुळे वातावरण शुद्ध व पवित्र बनते. गायी वासरांचा सांभाळ करणाऱ्या गोशाळा या अतिशय पवित्र कार्य करत असतात.

कत्तलखान्यात जाणाऱ्या वयस्कर, भाकड गायी, वासरांचा गोशाळांमध्ये आपुलकीने सांभाळ केला जातो. त्यांच्या या कार्यास आर्थिक मदतीचा हातभार लावल्यास प्रत्येकाला लाखमोलाचे आशीर्वाद नक्कीच मिळतात. जैन मंदिरातर्फे वेळोवेळी विविध शुभ प्रसंगी विविध गोशाळांना आवर्जून आर्थिक मदत केली जाते व भविष्यातही अशी आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न राहील अशी ग्वाही देतो.

याप्रसंगी श्रावक विनोदभाई मुथा सराफ, महावीरनगर श्रावक संघाचे उपाध्यक्ष मिठूलाल मेहेर, सिल्लोड येथील धरमचंद मंडलेचा, भिकचंद कर्नावट, सिल्लोड जैन मंदिर ट्रस्टचे सुभाषचंद बोकदिया, विनोद मंडलेचा, सुनील पगारिया, काठेड भाभी असा चतुर्वेदी संघ उपस्थित होता.

# नगर शहर विधानसभा काँग्रेसलाच मिळणार

## मंगल भुजबळ यांची माहिती; महाराष्ट्र विधानसभा निवडणुक स्क्रीनींग कमिटीचे चेअरमन मधूसुधन मिस्त्री यांची ग्वाही



मुंबई येथे काँग्रेसच्या ओबीसी विभागातील इच्छूक उमेदवारांची बैठक पार पडली. याप्रसंगी कमिटी चेअरमन मधूसुधन मिस्त्री समवेत मंगला भुजबळ आदी.

नगर – आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर, महाराष्ट्र काँग्रेस विधानसभा निवडणुकीचे स्क्रिनिंग कमिटीचे चेअरमन मधुसूदन मिस्त्री यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी विभागातील इच्छुकउमेदवारांची बैठक टिळक भवन, दादर, मुंबई येथे काँग्रेस पक्ष कार्यालयात २२ सप्टेंबरला पार पडली. या बैठकित मधुसूदन मिस्त्री यांनी ओबीसी प्रदेशअध्यक्ष भानुदास माळी यांना ओबीसी विभागातील चांगले काम करणारे व सक्षम असणारे इच्छुक उमेदवार मधील सिलेक्टेड उमेदवार व त्यांची संपूर्ण माहिति घेऊन नांवासह यादी पाठविणेबाबत सुचना केली तसेच इच्छूक मधील सिलेक्टेड उमेदवारांना तिकिट मिळवून देण्यासाठी स्वत: प्रयत्न करणार असल्याचे चेअरमन मिस्त्री यांनी सांगितले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, अहमदनगर जिल्हयात विधानसभेच्या १२ जागा असून ओबीसी समाजाची संख्या जिल्ह्यात जास्त असल्याने या जिल्ह्यात काँग्रेसकडून एक ओबीसी उमेदवार नक्कीच दिला जाईल तो ओबीसी उमेदवार देण्याची जबाबदारी माझी असेल असे स्पष्टपणे त्यांनी सांगून एकप्रकारे नगर शहराची जागा काँग्रेसचं लढवेल असे संकेत त्यांनी दिले. यावेळी काँग्रेस प्रदेशअध्यक्ष नाना पटोले, खासदार प्रणिती शिंदे, खासदार अॅड. गोयल पाडवी, खासदार डॉ. नामदेव किरसाण, माजी मंत्री अमित देशमुख, माजी आमदार के सी पाडवी, आमदार शिरीष नाईक, ओबीसी प्रदेशअध्यक्ष भानुदास माळी, ओबीसी राष्ट्रीय समन्वयक मंगल भुजबळ व ओबीसी विभागातील ईच्छूक सर्व उमेदवार उपस्थित होते.

# श्रुती संगीत निकेतनच्यावतीने रामकथा या संगीतिकेचे २८ सप्टेंबरला पुणे येथे आयोजन



नगर – नगरमधील यशानंतर आता श्रुती संगीत निकेतन या संस्थेच्या वतीने २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे रामकथा या संगीतिकेचे आयोजन करण्यात आले आहे. संगीतिका म्हणजे असे नाटक की ज्यात गीतांबरोबरच पात्रांमधील संवाद देखील गायनातूनच सादर केले जातात.

रामायणावरील प्रस्तुत संगीतिका ऑर्गन आणि हार्मोनियम वादक डॉ.मधुसूदन बोपर्डीकर यांनी लिहिली होती. या संगीतिकेला डॉ.धनश्री खरवंडीकर यांचे दिग्दर्शन लाभले असून संगीत दिग्दर्शन मकरंद खरवंडीकर यांनी तर नृत्य दिग्दर्शन कल्याणी कामतकर यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी गायक व गुरू पं.विकास कशाळकर प्रमुख अतिथी म्हणून लाभणार आहेत.

या संगीतिकेमध्ये शौनक कुलकर्णी, रिद्धी कुलकर्णी, रचेत काबरा, श्रावण शिंदे, भार्गव देशपांडे, शार्दूल खोल्लम, मोहित मेहेर, अमोघ पळसकर, आराध्य भालेराव, स्वराली जोशी, स्वराज कुलकर्णी, संगीता देऊळगावकर, अनुजा कुलकर्णी, दिव्या येनगंदूल, अनुष्का क्षीरसागर, पुष्पा औटी, मोहिनी खोल्लम, गंधार कुलकर्णी, प्रत्युष भणगे, वरद कुलकर्णी, अवधूत खेर, वेदांत कुलकर्णी, अमृता औटी, राघव काबरा, जयश्री कुलकर्णी हे गायक अभिनेते तर शर्वरी अवचट, वैष्णवी पाटोळे, रोशनी भोसले, रुचिता कुमार, मनुजा देशमुख, आर्या दालवाले, वैभवी चव्हाण, उर्वी भावे, या नृत्यांगना सहभाग घेणार आहेत.

संगीतिकेसाठी वेशभूषा : संतोष खोल्लम, नेपथ्य : नाना मोरे, रंगभूषा : चंद्रकांत सैंदाणे, प्रकाश योजना : माणिक देव, केशभूषा : सविता भैरी, ध्वनी व्यवस्था : रवी जाधव यांची असणार असून वाद्यांची साथसंगत मकरंद खरवंडीकर, सुपर्ण प्रताप, भूषण भणगे, नितीश भणगे यांची लाभणार आहे. या संगीतिकेसाठी ज्येष्ठ संगीतज्ञा कुमुदिनी बोपर्डीकर आणि सरस्वती संगीत विद्यालयाच्या संचालिका अनुजा संदीप कुलकर्णी यांचे विशेष सहाय्य लाभले आहे.

संगीतिका ही सर्वांसाठी विनामूल्य असून रामभक्तांनी आणि नाट्य व संगीत रसिकांनी या संगीतिकेचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने केले आहे.

# प्रीतीज पाठशाला आयोजित 'रीड इट वेल' वाचन स्पर्धेत एलकेजी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



प्रीतीज पाठशाला आयोजित ''रीड इट वेल'' एल.के.जी. ते आठवीपर्यंतच्या वाचन स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी.

नगर – प्रीतीज पाठशाला संस्थेने आयोजित केलेली 'रीड इट वेल' वाचन स्पर्धा उत्साहात पार पडली. एलकेजी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या या स्पर्धेत २०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी भरभरून सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे उद्दिष्ट मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढवणे आणि त्यांना वाचन कौशल्य विकसित करण्यास प्रोत्साहन देणे होते.

ही स्पर्धा २२ सप्टेंबर रोजी किडझी स्कूल, साईनगर येथे पार पडली. प्रमुख पाहुणे म्हणून रोमल सुराणा, संस्थापक, नन्हा ज्ञान फाउंडेशन, पुणे, तर विशेष पाहुणे म्हणून गगन वाधवा, प्राचार्य, किडझी स्कूल, सारसनगर उपस्थित होते. परिक्षक मंडळींमध्ये रोमल सुराणा, सोनाली कांकरिया, भावना शिंगवी, अनिता गंभीर, मधु बोरा, पूनम भंडारी, तृप्ती मुनोत यांचा समावेश होता.

विशेष आभार मानण्यात आले प्रीतीज पाठशालाच्या टीमचे रीना मुनोत, शीतल मुनोत, सोनिया घंगाळे, प्रगती व्यावहरे, मैथिली जोशी, रुशिता गुजराती, खुशी डागा, ज्यांच्या सहकार्याशिवाय हे यशस्वी करणे अशक्य होते.

कार्यक्रमाचे आयोजन करताना सचिन कानडे सरांचे विशेष आभार मानण्यात आले, ज्यांनी नेहमीच पाठिंबा दिला आणि स्थळ उपलब्ध करून दिले. तसेच उर्जा गुरु स्कूल आणि एस आर ई एफ स्कूल, अहमदनगर यांचेही मनःपूर्वक आभार, जिथून सर्वाधिक विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले आणि या कार्यक्रमाला यशस्वी बनवले.

विजेते : एलकेजी श्रेणी : १. युगंधरा अंकुश सुद्रिक – प्रथम, २. हिदान शैलेंद्र अडसुरे – द्वितीय, ३. युग चोपडा – तृतीय

यूकेजी श्रेणी : १. नियती स्वप्निल गांधी – प्रथम, २. प्रेक्षा पराग पारख – द्वितीय, ३. अंशुकुमार झा – तृतीय

उत्तेजनार्थ बक्षीस – हितिशा भंडारी, विहान कसाट

१ ली व २री श्रेणी : १. सान्वी आनंद अग्रवाल – प्रथम, २. दसान मिस्त्री – द्वितीय, ३. देव धमेचा – तृतीय, उत्तेजनार्थ बक्षीस – जिनीशा महावीर बोरा, परम गुगळे, माही तंवर, जिनेश देसरडा

३ री व ४थी श्रेणी: १. अन्विका झावरे – प्रथम, २. शौर्य गंभीर – द्वितीय, ३. पार्थो नाथ – तृतीय, उत्तेजनार्थ बक्षीस – कबीर मुजावर, प्रचिति शिंदे

५ वी व ६वी श्रेणी: १. अंश प्रितेश गुगळे, – प्रथम, २. सुरभी सुभाष टोडकर – द्वितीय, ३. तनीष्क रपारिया – तृतीय, उत्तेजनार्थ बक्षीस – देवराज संकेत गांधी, अर्णव बोथरा

७ वी व ८ वी श्रेणी: १. गर्वित संतोष इत्रा – प्रथम, २. प्रथम सिंग – द्वितीय, ३. अनुष्का रपारिया – तृतीय, उत्तेजनार्थ बक्षीस – हर्षवर्धन बन्सोडे, विवियाना विकी नउलानी, प्रणिता आर. त्र्यंबके.

या स्पर्धेत सहभागी प्रत्येक मुलाच्या वाचन कौशल्याचा गौरव मेडल, सटिर्फिकेट, फंकी लँड इनडोअर ॲम्यूजमेंट पार्कचे ५० टक्के डिस्काउंट कुपन्स देऊन करण्यात आला, विजेत्यांना सन्मान चिन्हे, फंकी लँड इनडोअर ॲम्यूजमेंट पार्कचे फ्री कुपन्स देण्यात आली. प्रीतीज पाठशाला च्या संस्थापक प्रीती सी. मुथीयन आणि चेतन मुथीयन यांनी सर्व विजेत्यांचे आणि सहभागींचे अभिनंदन करत वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले.

# मरण खूप सोप्प असतं...

दि. २०/०९/२०२४ आम्हा कोठारी कुटूंबियांच्या आयुष्यातला काळाकुट्ट दिवस. आमच्या थोरल्या जावूबाई सौ. मंगला चंपालालजी कोठारी अचानक आमच्यातुन निघून गेल्या. बातमी समजली ती वेळ संध्याकाळी ७.००वा. लक्ष्मी घरात येण्याची वेळ पण आमच्या घरातली सर्वात मोठी लक्ष्मी त्यावेळी घरातून निघून गेली.

बरं गेल्यातरी कशा. ४ वा. पर्यंत घरात बसलेल्या होत्या. दिर कोर्टात गेलेले होते. नेहमीची दैनंदिन कामे सुरू होती. नातीसाठी विणायला घेतलेले स्वेटर पुर्ण झाले होते. व्हिडीओ कॉल करुन तीला दाखविले. दुसऱ्या दोन नाती १०वी चे परिक्षा पास झाल्या होत्या पण राखी पोर्णिमेला येवू शकल्या नव्हत्या त्यांच्याशी फोनवर बोलल्या 'मी गीफ्ट घेवून ठेवले आहे पण तुम्हाला न्यायला मुंबईलाच यावे लागेल' हे सांगून झाले ते सुध्दा दुपारी ३.३० वा. च्या दरम्यान.

दुपारी ४.०० वा. आमचे दिर कोर्टातून घरी आले. घरात मोलकरीन असुनही स्वतः त्या उठल्या. तुम्हाला भूक लागली असेल, काहीतरी खायला करते असे म्हणुन स्वयंपाक घरात जायल्या निघाल्या. दिर आतल्या रुममध्ये गेले आणि त्या किचनमध्ये. तीच शेवटची नजरानजर. स्वयंपाकघरात फक्त गेल्या पण क्षणात कामवालीसमोरच एकाएकी खाली पडल्या. तोंडातुन कोणताही आवाज नाही, कन्हणे नाही, कुंथणे नाही, आई गं नाही, बाई गं नाही, कुठलाही आरडाओरडा नाही पण जिथे पडल्या तिथेच संपले.

झाडावर बसलेले बागेतील फुलपाखरु जसे अलगद उडून जाते तसे आमच्या सर्व परिवारातुन अलगद निघुन गेल्या. जणू त्यांना जायचेच होते पण दिर घरात येईपर्यंत त्यांनी यमदूतांनाही थांबवून ठेवले होते येवढी त्यांची ताकद.



सौ. मंगला चंपालालजी कोठारी

त्या खूप समजूतदार होत्या, आम्ही दोघी जावांनी त्यांचेबरोबर ४६ वर्ष संसार केला पण एकदाही एका शब्दानेही कुणाला दुखवले नाही. दोन सुना आल्या पण दोघींमध्ये कधी दुजाभाव केला नाही. कोणतीही वस्तु घेतली तर दोन मुली व दोन सुना चार सारख्या घ्यायच्या. त्या खूप प्रेमळ होत्या. कधी त्या आजारी आहेत आणि झोपून राहिले आहेत असे आम्ही कधीच पाहिले नाही. शांत बसणे त्यांना आवडत नव्हते. रेल्वेच्या प्रवासात सुध्दा त्यांच्या हातात लोकरीच्या सुया असायच्या. स्वेटर विणण्याची त्यांना भयानक आवड होती. कुठुनही येताना रंगीबेरंगी विविध प्रकारची लोकर घेवुन यायच्या आणि घरातील सर्वांसाठी स्वेटर विणायच्या.

स्वच्छतेची त्यांना प्रचंड आवड होती. नगरमध्ये आधीच पाण्याचा दुष्काळ आणि त्यांना तीन तीनदा हात धुण्याची सवय त्यावरुन कितीतरी वेळा त्यांनी बोलणीपण ऐकलेली आहेत. पण त्यांची सवय राहिली ती शेवटपर्यंत निटनेटकेपणाची तितकीची आवड. राहणं एकदम टापटीपीत. प्रत्येकवेळी असे वाटंयचं की नवीनच कपडे घातले. दागीनेपण कधी जुनाट चेमटलेले, काळे पडलेले दिसायचे नाहीत. माहेरी सोन्याचे दुकान असल्यामुळे प्रत्येकवेळी नवीन डिझाईनचे किंवा पॉलीश तरी करुन घ्यायचे परंतु सतत नव्यासारखे दिसत. खोटे घालणे त्यांना कधीही आवडत नव्हते. कपड्या लत्त्याचा, दागदागीन्यांचा असे सर्व शोक त्यांनी आयुष्यभर पुरवुन घेतले. कुठल्याही गोष्टींचा संग्रह करण्याची त्यांना प्रचंड हौस. घरात भांडीतर इतकी गोळा केली होती की बस. कुठेही काहीही नवीन घाटाचे भांडे दिसते तर त्या घ्यायच्याच. त्यावरुन त्यांना घरातल्यांची बोलणीही खावी लागत पण आम्हाला म्हणायच्या 'मी मुंबईत राहते इथे काही लागलं तर कोणाला मागणार, मला लागतं सगळं.'

एक महिन्यापुर्वी आम्ही राखीचा सण एकत्र केला. नुकतेच घराचे नुतनीकरण केले होते ते हौसेने दाखविले. त्यांची हौस, कल्पनाशक्ती या सगळ्या गोष्टींचं खुप कौतुक वाटले पण आता जाणवते या सगळ्यांमध्ये त्या अलीप्त होत्या. घरची गरज म्हणून त्या करीत होत्या, पण स्वतः मात्र मनाने कुठेच गुंतत नव्हत्या.

नुकतेच पर्युषण पर्व पार पडले. तीन–चार वर्षापासुन त्या मुंबई सोडून जिथे गुरू महाराज असतील त्यांच्या सान्निध्यात जायच्या. याही वर्षी उदयपुरला गेल्या. स्थानकात जास्तीत जास्त पुण्यकर्म करायच्या, जप तप करायच्या. या सात–आठ वर्षात तर फारच बदलुन गेल्या होत्या. रोज नवकार मंत्राच्या नऊ माळा पुर्ण करण्याचा त्यांनी नियम घेतला होता. घरात नातीचे लग्न होते त्या गडबडीत निवांत जप करायला वेळ नसायचा पण त्या रात्री २–२ वाजेपर्यंत जप पुर्ण करुन मगच झोपायच्या. सर्वांशी खुप खुप प्रेमाने वागत होत्या. पण आतमध्ये मात्र सर्व बंध तोडत चालल्या होत्या म्हणुनच एका सेकंदात अगदी परिवाराच्या समोर बघता बघता जशी वाऱ्याची झुळूक येते आणि दिवा विझतो त्या प्रमाणे क्षणात त्या आमच्यातुन निघून गेल्या. अगदी आमच्या सासूबाई सारखच भरल्या घरातुन, भरल्या कुंकूवाने सवाष्ण मरण आलं. आम्ही जेव्हा तेथे गेलो त्यांचा शांत प्रसन्नचित्त चेहरा पाहिला आणि वाटले अरे माणूस मृत्यूला का बरे घाबरतो? मरण किती सोप आहे आता आहे आता नाही. फक्त एका क्षणाचा खेळ.

आपण नियतीच्या हातातले बाहुले आहोत हेच खरे. पण परमेश्वराकडे प्रार्थना मात्र करावीशी वाटते देवा मलाही असच मरण येवू दे...

– अॅड. मंगला राजेश कोठारी
मो.नं. ९८२२७५८९६०

# राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघाची २९ सप्टेंबर रोजी निवड चाचणी

नगर – महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने १५, १७ व २० वर्षांखालील फ्री स्टाईल, ग्रीको रोमन मुले व मुलींची (फ्री स्टाईल) राज्यस्तरीय स्पर्धाचे आयोजन ऑक्टोबर २०२४ च्या पहिल्या आठवड्यात होणार असून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्ह्याचा संघ निवड चाचणी स्पर्धा २९ सप्टेंबर रोजी पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील 'श्री नागेश्वर मंगल कार्यालय', कापरी चौक, येथे सकाळी ९ वाजता होणार आहे.

सन २००९ व २०१० या सालामध्ये जन्मलेला (१४ व १५ वर्ष) व सन २०११ मध्ये जन्मलेला (१३ वर्ष) मेडिकल सर्टिफिकेट व पालकांचे संमती पत्र असेल तरच सहभागास पात्र असेल सन २००७ व २००८ या सालामध्ये जन्मलेला (१६ व १७ वर्ष) व सन २००९ मध्ये जन्मलेला (१५ वर्ष) मेडिकल सर्टिफिकेट व पालकांचे संमती पत्र असेल तरच सहभागास पात्र असेल. सन २००४, २००५ व २००६ या सालामध्ये जन्मलेला (१८, १९ व २० वर्ष) व सन २००७ मध्ये जन्मलेला (१७ वर्ष) मेडिकल सर्टिफिकेट व पालकांचे संमती पत्र असेल तरच सहभागास पात्र असेल.

तरी, संघ निवड चाचणी स्पर्धेसाठी जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या सर्व कुस्तीगीरांनी स्पर्धेत सहभागी व्हावे तसेच सर्व वस्ताद मंडळी, पालक, कुस्ती शौकीन यांनी प्रेक्षणीय कुस्ती स्पर्धेचा आनंद घेण्यास उपस्थित रहावे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप, सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ, उपाध्यक्ष पै. शिवाजी शिर्के (महाराष्ट्र केसरी), उपाध्यक्ष पै. अर्जुन शेळके, सह सचिव पै. प्रविण घुले व खजिनदार पै. शिवाजी चव्हाण यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळ उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष पदी अनिल निकम यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी ओबीसी नेते कल्याणराव दळे, नाभिक महामंडळ जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, माऊली गायकवाड, दामोदर बिडवे, पांडुरंग भंवर, सौ. भारती सोनवणे, सुरेन्द्र कावरे आदी. (छाया - विजय मते)

## नाभिक महामंडळ उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी अनिल निकम

नगर - नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळ उत्तर महाराष्ट्र विभागीय बैठकीत ओबीसी नेते प्रदेश अध्यक्ष कल्याणराव दळे यांनी अनिल निकम यांची उत्तर महाराष्ट्र (नगर, नासिक, जळगांव, धुळे, नंदूरबार) कार्याध्यक्षपदी नियुक्ती केली.

यावेळी नाभिक महामंडळ जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष माऊली गायकवाड, प्रदेश कार्याध्यक्ष दामोदर बिडवे, सरचिटणीस पांडुरंग भंवर, राज्य महिला अध्यक्षा सौ. भारती सोनवणे, युवा कार्याध्यक्ष सुरेन्द्र कावरे, नाभिक महामंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आज अनेक संस्था आणि संघटना आपल्या राज्यात आहेत. आपल्या आजूबाजूच्या जातीच्या धर्माच्या विविध समाजाच्या संघटना दिसतील. सर्व संघटनांचा हेतू , उद्देश हा व्यापक हित साध्य करणे हा असतो. महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळ हि संघटना देखील व्यक्ती व्यक्तींमध्ये जिव्हाळा निर्माण करुन सर्वांना संकटात दिलासा देण्याचे काम करते.

नगर जिल्ह्यात नाभिक महामंडळाचे काम लोक हिताचे असल्याने संघटनेतील कार्यकर्त्यां-मध्ये सुसंवाद असतो. आपुलकी व आपलेपणाची भावना ठेवुन संघटना अजून विकसित करण्याचे काम मी प्रामाणिकपणे करील, असे प्रतिपादन उत्तर महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे कार्याध्यक्ष अनिल निकम यांनी केले.

ओबीसी नेते कल्याणराव दळे यांच्या हस्ते अनिल निकम यांना नियुक्तीचे पत्र देवुन सन्मान करण्यात आला. या सन्मानाला उत्तर देतांना निकम म्हणाले, मी उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष पद घेतले असले तरी एक सर्वसामान्य कार्यकर्त्याप्रमाणे काम करीत राहणार. समाजावर होणारा अन्याय, नाभिक महामंडळाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार तसेच सर्व नाभिक समाजातील प्रत्येक बांधवांना बरोबर घेवुन सर्व कार्याचा ठसा उमटवणार, असे सांगितले.

# अहमदनगर मर्चंटस् बँकेच्या सभासदांना १५ टक्के लाभांश

### चेअरमन हस्तीमल मुनोत यांची माहिती; बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत




अहमदनगर मर्चंटस् को-ऑप. बँकेच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत. समवेत संचालक मंडळातील सर्व सदस्य. समोर उपस्थित बँकेचे सभासद.

नगर - सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण करणारी अहमदनगर मर्चंटस बँक एक मोठी आर्थिक संस्था असून नगरच्या आर्थिक विकासात बँकेचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. सभासद, खातेदार, ठेवीदारांचा विश्वास आणि सर्व तत्कालीन व विद्यमान संचालक, अधिकारी, कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नाने बँक उंचीवर पोहोचली आहे. अनेक आव्हानांना सामोरे जात बँकेने उत्कृष्ट कारभाराची परंपरा जपली आहे. त्यामुळेच चालू आर्थिक वर्षात सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा ठराव केला आहे. बँकेला श्येडुल्ड बँकेचा दर्जा मिळण्यासाठीही रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव दाखल करण्यात येईल, अशी माहिती मर्चंटस बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी दिली.

अहमदनगर मर्चंटस बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा केशर गुलाब मंगल कार्यालय येथे हस्तीमल मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली. यावेळी व्हा. चेअरमन अमित मुथा, संचालक अनिल पोखरणा, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सी.ए.आयपी अजय मुथा, सी.ए.मोहन बरमेचा, संजय चोपडा, किशोर मुनोत, सुभाष बायड, मिनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, पेमराज बोथरा, सी.ए.प्रविण कटारिया, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल पुराणिक आदींसह सभासद उपस्थित होते.

प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील पुराणिक यांनी अहवाल वाचन केले व विषयपत्रिकेवरील विषयांची माहिती दिली. चेअरमन हस्तीमल मुनोत पुढे म्हणाले, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात बँकेला ३० कोटी ३१ लाखांचा ढोबळ नफा झालेला आहे. आवश्यक तरतुदी वजा करून निव्वळ नफा ६ कोटी ३ लाख रुपये इतका मिळाला. कर्जावरील व्याजात बँकेने अहवाल वर्षात २५ कोटी १६ लाख रुपये रिबेट दिला असून रिबेटच्या रकमेचे उत्पन्नाशी शेकडा प्रमाण २३.४६ टक्के इतके आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात रिबेट देऊनही बँकेस चांगला नफा झाला आहे. बँकेच्या एकूण कर्जदारांपैकी ७५.९५ टक्के कर्जदारांनी रिबेटचा फायदा घेतला आहे.

लॉकडाऊन सारख्या आपत्तीमुळे दीर्घ काळ व्यापारी, सर्वसामान्यांना अडचणीचा सामना करावा लागला. याही परिस्थितीत व्यापाराला, अर्थकारणाला चालना देण्यासाठी बँकेने त्या कालावधीत कर्जावरील व्याजदर कमी केले होते. त्याचा मोठा फायदा व्यापारी, कारखानदार व इतर कर्जदारांना झाला आणि आजही कर्जावरील व्याज दर इतर बँकांच्या तुलनेत कमीच आहे. ३१ मार्च २०२४ अखेर बँकेकडे राखीव व इतर निधी २१५ कोटी ८० लाख रुपये असून बँक भक्कम आर्थिक पायावर उभी आहे. सध्या व्यापारी बँकांचा चेहरा बदलत आहे. त्यामुळे मर्चंटस बँक अत्याधुनिक डिजिटल बँकिंग सेवा उपलब्ध करून देत आहे. खातेदारांना त्यांचे पासबुक प्रिंट करून घेण्यासाठी पासबुक किऑस्क मशीनची सुविधा ४ शाखांमध्ये सुरू करण्यात आली आहे. तसेच येत्या काळात सर्वच शाखांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही सुविधा खातेदारांना २४ बाय ७ मिळेल. ज्या खातेदारांनी खात्यास स्वतःचे ईमेल आयडी रजिस्टर केले आहेत त्यांना दरमहा त्यांच्या ईमेलवर त्यांच्या खात्याचे ई स्टेटमेंट पाठवले जाते. ज्या ग्राहकांनी ईमेल व मोबाईल नंबर रजिस्टर केले नाहीत, त्यांनी नजीकच्या शाखेत जाऊन रजिस्ट्रेशन करावे. बँकेच्या चितळे रोड शाखेत सध्या कॅश डिपॉझिट मशीन कार्यान्वित झाले आहे. लवकरच दाळमंडई व मार्केट यार्ड शाखेत कॅश डिपॉझिट मशीन बसवण्यात येणार आहे तसेच लवकरच तारकपूर व एमआयडीसी शाखेत एटीएम मशीन सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्याचाही मानस आहे. सर्वांच्या सहकार्याने बँकेची प्रगतीची घोडदौड अशीच कायम राहिल असा विश्वास चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी व्यक्त केला.

यावेळी सभासद राजेंद्र चोपडा आणि महावीर पोखरणा यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना चेअरमन हस्तीमल मुनोत, सी.ए.,आयपी अजय मुथा यांनी सर्व तांत्रिक व कायदेशीर बाबी विस्तृतपणे सांगून समर्पक व सडेतोड उत्तरे देत बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे निदर्शनास आणून दिले. या उत्तरांबद्दल सर्व उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त करीत बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व एकूणच चांगल्या कारभारावर विश्वास व्यक्त केला.

विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना एकमताने मंजूरी देण्यात आली. शेवटी व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.

## आनंदऋषीजी डेंटल इन्स्टिट्यूशन येथे २८ सप्टेंबरला मोफत दंत तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबीर

नगर - जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अंतर्गत आनंदऋषीजी डेंटल इन्स्टिट्यूशन येथे २८ सप्टेंबर रोजी मोफत दंत तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत शिबिर होणार आहे. तज्ज्ञ डॉ. अर्पणा पवार, डॉ. प्राची गांधी, ओरल सर्जन डॉ. स्वराज ठोले रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

दातासंबंधीच्या सर्व समस्यांवर अत्याधुनिक उपचार आनंदऋषीजी डेंटल विभागात कमी दरात उपलब्ध आहेत. एकाच छताखाली तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टर तसेच दर्जेदार मल्टीस्पेशालिटी उपचार सुविधा याठिकाणी आहेत. दातांचे आरोग्य प्रत्येकासाठी महत्वाचे असते. शिबिरात इम्लांट १३ हजार ५०० रुपये पासून पुढील किंमतीत, रूट कॅनल २ ते ३ हजार रुपयात, सिरॅमिक कॅप बसविणे १५०० ते २ हजार रुपये, मेटल कॅप १ हजार रुपये, नवीन कवळी बसविणे ८ हजार, १० हजार, १४ हजार रुपयांत, मशीनव्दारे दात स्वच्छ करणे ५०० रुपयांपुढे, सिमेंट भरणे, दात काढणे प्रत्येकी ५०० रुपयांपुढे अशा अत्यल्प खर्चात करण्यात येणार आहे. शिबिरासाठी नाव नोंदणी आवश्यक असून औषध खर्च वेगळा असेल.

आनंदऋषीजी हॉस्पिटल-मध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीन द्वारा सेवा उपलब्ध आहे. आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा २४ तास उपलब्ध आहे. हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्ट सह ८०० रुपये, सिटीस्कॅन १२५० रूपये तर एमआरआय २५०० रुपयात उपलब्ध आहे. अद्ययावत दंतोपचार सुविधांचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्यावतीने करण्यात आले आहे. शिबिर नाव नोंदणी व दातांच्या समस्यांसाठी संपर्क - ९४०४४७२१९९.

## मयत अनोळखी इसमाची माहिती कळविण्याचे आवाहन

नगर - रेसिडेन्सिअल हायस्कुल गेटजवळ बेशुद्ध अवस्थेत आढळून आलेल्या इसमाबाबत माहिती देण्याचे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक तोफखाना पोलीस स्टेशन यांनी केले आहे.

हा इसम अनोळखी ६० वर्षे असलेला, सावळा रंग, ५ फुट २ इंच उंची, केस काळे, पांढरे, नाक सरळ असून अंगात काळ्या रंगाचे स्वेटर, पांढऱ्या रंगाची शॉर्ट व त्यावर काळ्या व लाल रंगाची डिझाईन आहे. इसमावर उपचार करण्यापूर्वीच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मयत घोषित केले. इसमाच्या मृतदेहाचा पंचासमक्ष पंचनामा करण्यात येऊन नातेवाईकांचा शोध घेण्यात आला. नातेवाईकांचा शोध न लागल्याने तसेच मृतदेह डीकंपोझ होत असल्याने ११ सप्टेंबर रोजी सरकारी खर्चात अत्यंसंस्कार करण्यात आले आहेत. मयतबाबत माहिती मिळाल्यास तोफखाना पोलीस स्टेशन दूरध्वनी क्र. ०२४१-२४१६११८ अथवा सहायक पोलीस निरीक्षक जी. जी. गोरडे भ्रमणध्वनी क्रमांक ८९७५१६२९७७ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय थाळीफेक स्पर्धेसाठी सार्थक सकट याची निवड



नगर - नगरचा थाळीफेकपटू सार्थक सकट याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. बालेवाडी (पुणे) येथील शिवछत्रपती क्रिडा संकुलात १९ ते २१ सप्टेंबर रोजी झालेल्या महाराष्ट्र अ‍ॅथलेटिक्स असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत त्याने थाळी फेक या प्रकारामध्ये ४५.३७ मीटर थाळी फेकून प्रथम क्रमांक पटकाविला.

भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी त्याची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तो सारडा महाविद्यालयात शिक्षण घेत असून त्याला अ‍ॅड. श्रीनिवास कराळे व शंभू यादव (गुरूजी) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच त्याला अहमदनगर अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनचे मार्गदर्शक दिनेश भालेराव व श्रीरामसेतू आवारी, संदीप घावटे यांचे सहकार्य लाभले. सार्थकने यापूर्वीही अनेक स्पर्धांत उत्तम कामगिरी केली आहे.

# भिंगार अर्बन बँकेच्या सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर

### सभासदांच्या विश्वासामुळे भिंगार अर्बन बँक प्रगतीपथावर : चेअरमन अनिलराव झोडगे यांची माहिती; बँकेची ११६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत



भिंगार अर्बन को-ऑप बँक लि.ची ११६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा भाग्यलक्ष्मी सांस्कृतिक भवन, भिंगार येथे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

नगर - सभासदांच्या विश्वासामुळे भिंगार अर्बन बँक आज प्रगतीपथावर वाटचाल करत आहे. बँकेच्या माध्यमातून आजपर्यंत घेण्यात आलेल्या प्रत्येक निर्णयात सभासदांचे व खातेदार आणि ठेवीदार यांच्या हिताचे निर्णय घेतल्यामुळे प्रत्येक व्यक्ती बँकेवर विश्वास ठेवत आहे, आणि त्या विश्वासाला आम्ही संचालक मंडळ कधीही तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे यांनी दिली आहे.

भिंगार अर्बन को-ऑप बँक लि.ची ११६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा भाग्यलक्ष्मी सांस्कृतिक भवन, भिंगार येथे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, संचालक राजेंद्र पतके, कैलास खरपुडे, विष्णु फुलसौंदर, अमोल धाडगे, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर, कैलास दळवी, एकनाथराव जाधव, नामदेवराव लंगोटे, तिलोत्तमाबाई करांडे, अनिता भुजबळ, रामसुख मंत्री, राजेंद्र बोरा व सभासद उपस्थित होते.

पुढे बोलतांना अनिलराव झोडगे यांनी सभासदांचे स्वागत करतांना बँकेची आर्थिक स्थिती विषद केली. अल्पावधीमध्ये बँकेने मोठी प्रगती केली आहे. सध्या बँकेकडे ३३० कोटी रुपयांच्या ठेवी तसेच २२२ कोटी कर्ज वाटप केले आहे. बँकेला आर्थिक वर्षात ३ कोटी ७८ लाख निव्वळ नफा झाला आहे. मार्च २०२४ अखेर बँकेला ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे. कर्जामध्ये वाढ झाली असून, वसुलीचे कामही सक्षमपणे होत आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. खातेदारांचा व सभासदांचा बँकेवर असलेल्या दृढ विश्वासामुळेच ठेवीमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

यावेळी किसनराव चौधरी म्हणाले की, भविष्यात बँकेच्या ठेवी ५०० कोटी व कर्ज वाटप ३०० कोटी पर्यंत वाढविणेचे उद्दीष्ट बँकेने ठेवले आहे. बँकेच्या आठ शाखा सध्या चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. सर्व शाखांमध्ये २४ तास ए.टी.एम. सुविधा कॅश डिपॉझिटसह, आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी., लॉकर्स सुविधा, बाहेरगावचे डी.डी. सुविधा दिल्या जात आहेत. सर्व शाखा ऑनलाईनने जोडल्या आहेत. तसेंच, बँके मार्फत नजिकच्या काळात मोबाईल बँकिंग सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तत्पर सेवक वर्ग व माझे सर्व संचालक मंडळ सचोटिने कामकाज करित आहेत.

बँकेचे व्यवस्थापक शशीकांत महाजन यांनी सभेच्या नोटीसचे वाचन करुन, नोटीसीतील विषयांना सभासदांची मंजूरी घेतली. विष्णू फुलसौंदर यांनी आभार मानले.




श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनची सेठ नंदलाल धुत इंग्लिश स्कूल आणि मोहनलाल रामअवतार मानधना ज्युनियर कॉलेज येथे हिंदी दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

## श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनमध्ये हिंदी दिवस साजरा

नगर - १४ सप्टेंबर हा दिवस सर्वत्र हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनची सेठ नंदलाल धुत इंग्लिश स्कूल आणि मोहनलाल रामअवतार मानधना ज्युनियर कॉलेज येथे हिंदी दिनानिमित्त १३ आणि १४ सप्टेंबर रोजी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यावेळी सरस्वती पूजन करून स्पर्धांना सुरुवात करण्यात आली.

यामध्ये इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी हिंदी देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी संगीत शिक्षक कल्याण मुरकुटे हे परीक्षक म्हणून होते. तसेच इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी आरती गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली या स्पर्धेसाठी सौ. उमा जोशी या परीक्षक होत्या.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी संवाद अभिनय स्पर्धा घेण्यात आली इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी लघुकथा स्पर्धा तसेच हिंदी साहित्यकारांचे चित्र अशी चित्रकला स्पर्धा ठेवण्यात आली. या चित्रांचे परीक्षण चित्रकला शिक्षिका सौ. पूजा म्हस्के यांनी केले. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी काव्य गायन स्पर्धा घेण्यात आली. इयत्ता पाचवी ते सातवीच्या स्पर्धांचे परीक्षण सौ. शिल्पा मुळे यांनी केले.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली तसेच नववीच्या विद्यार्थ्यांसाठी दोहे वाचन व शेरो शायरी आणि इयत्ता दहावीसाठी नाटिका अशा स्पर्धा घेण्यात आल्या. या नाट्यकेमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी पूर्वीच्या काळापासून ते आत्ताच्या काळापर्यंत बदललेल्या स्त्रीचे रूप अशी नाटिका सादर केली. इयत्ता आठवी ते दहावीच्या सर्व स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून सौ. विणा विनीत मुंगी यांना आमंत्रित करण्यात आले होते

या विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. प्रत्येक स्पर्धेमधून प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक निवडण्यात आला.

या सर्व स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना हिंदी शिक्षिका सौ. सुचेता नगरकर, सौ. कल्याणी नजान व सौ. रोथेल लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमासाठी शाळेच्या प्राचार्य सौ. राधिका जेऊरकर, उपमुख्याध्यापिका संपदा देशपांडे, समन्वयक सुषमा उजागरे व श्रेय कुमार गुंडू तसेच सर्व शिक्षक गण उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# 'रेव्हेन्यू'ची सहकारातून समृद्धीकडे वाटचाल

### उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे यांचे प्रतिपादन; रेव्हेन्यू सोसायटीची १०३ वी वार्षिक सभा



रेव्हेन्यू ॲण्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंटस् गर्व्हमेंट सर्व्हंटस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहमदनगर या संस्थेची सन २०२३-२४ ची १०३ वी सर्वसाधारणसभा संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे प्रतिनिधी म्हणून उपजिल्हाधिकारी (महसूल) अतुल चोरमारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. (छाया - बबलू शेख)

नगर - रेव्हेन्यू सोसायटीचा चढता आलेख आहे. दरवर्षी प्रगती साधणारी ही सोसायटी आहे. सभासदाभिमुख अनेक चांगले निर्णय सोसायटीने घेतले आहे. सभासदांना सहकारातून समृद्धीकडे घेऊन जाणाऱ्या या सोसासटीची वाटचाल प्रेरणा देणारी आहे, असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी (महसूल) अतुल चोरमारे यांनी केले.

रेव्हेन्यू ॲण्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंटस् गर्व्हमेंट सर्व्हंटस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहमदनगर या संस्थेची सन २०२३-२४ ची १०३वी वार्षिक सर्वसाधारणसभा संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे प्रतिनिधी म्हणून उपजिल्हाधिकारी (महसूल) अतुल चोरमारे यांच्या अध्यक्षतेखाली नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील नेहरु सभागृहात पार पडली.

यावेळी संस्थेचे चेअरमन संदीप तरटे, व्हा. चेअरमन राजेश घोरपडे, संचालक संतोष मांडगे, सुरेश राऊत, बाबासाहेब दातखिळे, गणेश गर्कळ, प्रवीण बोरुडे, प्रदीप चव्हाण, हरिभाऊ सानप, विजय हरिश्चंद्रे, प्रदीप अवचर, वृषाली करोसिया, सुनंदा मरकड, सनी जाधव, विकास मोराळे, संतोष ताठे व जनरल सेक्रेटरी बाबासाहेब पालवे आदींसह सभासद उपस्थित होते.

सभेची सुरुवात सभासद गणेश नरोटे यांच्या कन्या श्रावणी, श्रेयशी व शर्वरी यांच्या स्वागतगीताने झाली. सभेत संस्थेच्या www.revenue society.com या वेबसाईटचे उद्घाटन श्री. चोरमारे यांच्या हस्ते करण्यांत आले. त्यानंतर सभासदांना सन २०२३-२४ सालासाठी दिलेल्या ८.२५% वर्गणी व्याजास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. या सभेमध्ये सभासदांनी उपविधी दुरुस्तीसाठी मान्यता देऊन, सभासद कर्ज मर्यादा रु.२० लाखांवरून रु. २५ लाख आणि तातडीचे कर्ज रु ३०,००० वरुन रु.५०,००० पर्यंत करण्यात आले. मयत सभासदांच्या वारसांसाठी मदत ३ लाख रुपयांवरुन ६ लाख करण्यात आली. माऊली ट्रस्टचे वाचनालयास रु. ५० हजारांची पुस्तके देण्यास मंजुरी देणेत आली, तसेच माजी अध्यक्ष यांच्या हस्ते सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा ट्रॉफी देवून व सेवानिवृत्त सभासदांचा शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी सर्व विभागांच्या संघटनांचे पदाधिकारी संतोष तनपुरे, अक्षय फलके, गणेश जाधव, डॉ. मुकुंद शिंदे, रवि डिक्रुज, राजेंद्र आंधळे, प्रशांत हासे, राहुल मापारी, सुरेश राऊत यांचा सत्कार करणेत आला. या सभेत माजी पदाधिकारी कैलास साळुंके, राजेंद्र आंधळे, शंकर जगताप, दीपक कारखिले, विजयकुमार धोत्रे, भाऊसाहेब डमाळे, संतोष तनपुरे, सुरेश जेठे, दिनेश पुसदकर, सभासद सुरेश आघाव, गिरीश गायकवाड, कालीचरण मखरे, दिलीप जायभाय, अतुल सुपेकर, महेंद्र शिंदे, संजय जायभाय व इतर सभासदांनी सहभाग घेतला.

सभेत सर्व सभासदांनी हिरीरिने भाग घेवून संस्थेच्या केडगाव येथील स.नं. ३४० मधील ७.५० एकर ही ग्रीन झोनमधून येलो झोन करुन विकसित करण्यासाठी परवानगी दिली. शेवटी चेअरमन व व्हा. चेअरमन यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रसन्ना पाठक यांनी केले. दरवर्षीप्रमाणेच आजची सभाही खेळीमेळीत पार पडली.

**अचिव्हर**

**शिकवण्याची आवड शिक्षकाला कोणत्याही परिस्थितीमध्ये शिकवायला भाग पाडते. अशातच मध्य प्रदेशमधील दमोह जिल्ह्यातील लिधौरा गावातल्या माधव पटेल या शिक्षकाने तेथील लहान मुलांना शिक्षणाचे धडे देण्यास सुरूवात केली. येथील प्रत्येक चौकात मुले शिक्षण घेताना दिसतात. कोणत्याही गल्लीत प्रवेश केलात तर रस्त्याच्या शेवटी भिंतीवर गणित आणि विज्ञानाची सूत्रे लिहिलेली दिसतात. संपूर्ण गावच जणू क्लासरूम झाले आहे.**

# हाडाचे शिक्षक!

मध्य प्रदेशमधील दमोह जिल्ह्यातील लिधौरा गावातल्या माधव पटेल या शिक्षकाने तेथील लहान मुलांना शिक्षणाचे धडे देण्यास सुरूवात केली. त्यांच्या या मेहनतीचे फळ म्हणून की काय पण शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय पुरस्काराने पुरस्कृत केलेल्या ५० शिक्षकांमध्ये त्यांचेही नाव आहे. ४० वर्षीय माधव दमोह जिल्ह्यातील सरकारी लिधौरा मिडल स्कूलमध्ये सहावी ते आठवीपर्यंतच्या मुलांना शिकवतात. कोविडच्या काळात मुलांना शाळेत जाता आले नाही, म्हणून माधव यांना मोहल्ला क्लासची कल्पना सुचली. यासाठी त्यांनी काही ज्येष्ठ विद्यार्थ्यांना जोडले आणि त्यांना आपापल्या परिसरातील मुलांना एकत्र करून शिकवण्यास सांगितले. त्यांच्या कल्पनेतूनच मुलांची शिकण्याची पोकळी भरून काढल्याचे संपूर्ण गावकरी सांगतात.



माधव सांगतात, 'मी मुलांच्या घराभोवती फळे बनवले, जेणेकरून मुले एकमेकांशी खेळतील तेव्हा फळ्याच्या मदतीने खेळतानाही काहीतरी वाचत राहतील. आम्ही त्यांच्या घरी जाऊ शकत नव्हतो, म्हणून आम्ही त्यांच्या आजूबाजूच्या लोकांना आमच्यासोबत जोडले. ते सांगतात, 'आम्ही प्रार्थना सभेत आठवड्यातून जास्तीत जास्त दिवस शाळेत येणाऱ्या मुलाचा सन्मान करू लागलो. यामुळे इतर मुलांमध्येही सकारात्मक विचार आला की, आपली नावेही फलकावर यायला हवीत. महिनाभरात सर्वाधिक वेळा शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांच्या घरी आम्ही गेलो आणि त्यांचा संपूर्ण परिसरासमोर सत्कार केला. त्यामुळे इतर पालकांनी त्यातून प्रेरणा घेतली आणि आमच्या शाळेतील उपस्थिती वाढतच गेली.

'मुल फक्त सहा तास शाळेत राहते. त्यानंतर ते घरीच असते. अशा परिस्थितीत मुलांना शाळेशिवाय शिक्षणाची गरज आहे, असे मला वाटले. मी गावातील शाळा-कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांशी बोललो. त्यांना सांगितले की तुम्ही मोकळे असाल तेव्हा मुलांना शिकवण्यात थोडी मदत करा. ते सर्वांनी मान्य केले. पण संसाधनांचा प्रश्न होता. अशा स्थितीत मी गावातील काही ठिकाणे ओळखली जिथे बसायला जागा आहे. तेथील भिंतीवर ब्लॅकबोर्ड पेंट केले. माजी विद्यार्थ्यांना खडू-डस्टर दिले. त्यामुळे आता त्याला वेळ मिळेल तेव्हा तो जवळच्या मुलांना एकत्र करून शिकवतो, असेही ते सांगतात.

माधव यांना पालकांनाही मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घ्यायचे होते. त्यामुळे शाळेतील शिक्षक पालकांच्या घरी जाऊन त्यांना भेटायचे तेव्हा ते त्यांच्या मोटरसायकलवर लायब्ररीची पुस्तके घेऊन जायचे. आई-वडिलांपर्यंत पोहोचताच ते पुस्तकं पाहू लागले. यातून त्यांना शाळेच्या ग्रंथालयात कोणत्या प्रकारची पुस्तके आहेत हे कळू लागले. ही पुस्तके आमच्या लायब्ररीतील मुलेही वाचतात, असे शिक्षकांनी पालकांना सांगितल्यावर पालकांनी पुन्हा मुलांना 'पाणी की खोज' हे पुस्तक वाचले आहे का, त्यात काय लिहिले आहे, कथा काय आहे, असे विचारण्यास सुरुवात केली. यानंतर मुलांमध्ये पुस्तके वाचण्याची उत्सुकता वाढू लागली. अशाप्रकारे, प्रथमतः पालक वाचनालयात सामील झाले, दुसरे म्हणजे मुले कारणे सांगायची आणि नाखुश होती तीही पुस्तके वाचू लागली.

ते सांगतात, 'शाळेच्या आधी आणि शाळेनंतर एक तास देणे ही काही मोठी गोष्ट नाही. आमच्याकडे ४० मिनिटांचा कालावधी आहे. आपण २५-३० मिनिटे शिकवतो आणि नंतर मुलांकडून फीडबॅक घेतो. त्यामुळे आपण दररोज पाच ते दहा मिनिटांनी शिकवण्याची वेळ वाढवली तर आपण मुलांना चांगल्या पद्धतीने शिकवू शकतो. कुठेतरी इच्छाशक्तीचा मुद्दा आहे. आपण समर्पणासाठी तयार असलो की अतिरिक्त कामाचा त्रास होत नाही, असे माधव सांगतात.

# जोश

## शेर की जुबानी

मंजिल का नाराज होना भी
जायज था।
हम भी तो अजनबी राहों से
दिल लगा बैठे थे।

तुम नजर नहीं आते तो
आजकल शाम नहीं ढलती।
बस उदास सा है सबकुछ,
दिल से दिल की बात नहीं निकलती।

मन का कोई कोना अंधेरे में ना रहे,
एक चिराग भीतर भी जलाओ यारों।

## ॲप वर्ल्ड

### चॅट जीपीटीच्या मदतीने शोधा नोकरी!




आता नवीन नोकरी मिळवण्यासाठी चॅटजीपीटी मदत करणार आहे. चॅटजीपीटीच्या मदतीने तुम्ही आकर्षक आणि मुद्देसूद रिझ्यूम तयार करु शकता. यासाठी तुमच्या क्षेत्रातील कौशल्य आणि अनुभव याची माहिती चॅटजीपीटीला द्यावी लागेल. तसेच चॅटजीपीटीच्या मदतीने तुम्ही मुलाखतीची तयारी करु शकता. तुमच्या क्षेत्रात नेमके कोणते प्रश्न सर्वाधिक विचारण्यात येतात, याची उजळणी होईल. चॅटजीपीटी तुम्हाला लिंक्डइन प्रोफाईल, फेसबुक प्रोफाईल कसे आकर्षक आणि मुद्देसुद करायचे याची माहिती देईल. करियरबाबत अजूनही साशंक असाल, संभ्रम असेल तर चॅटजीपीटी तुम्हाला योग्य सल्ला देण्यास मदत करेल. तुमच्या अनुभवावरुन तुम्ही काय करायचे याची माहिती देईल.

## स्मार्ट शॉपिंग

### स्मार्टफोन घेताय?

दसरा, दिवाळीच्या निमित्ताने बरेच जण स्मार्टफोन खरेदी करतात. नवा फोन खरेदी करताना काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. सर्वात आधी तुमचं बजेट ठरवा. तुमची नेमकी गरज ओळखा. फोनमधली ऑपरेटिंग सिस्टिम तपासून घ्या. जुनी ओएस सिस्टिम असली तरी त्यात अपडेटची सोय असल्याची खात्री करून घ्या. फोन मेमरी ही सुद्धा महत्त्वाची बाब आहे. आज आपण बरीच ॲप्स डाउनलोड करतो. त्यामुळे जास्त मेमरीवाला फोन घ्या. फोनच्या कॅमेऱ्याचा दर्जाही तपासा.




## व्हॉट्स न्यू?


### जिओने वाढवलं ॲपल, गुगलचं टेन्शन!




रिलायन्स जिओ आता आपल्या ग्राहकांना १०० जीबी क्लाउड स्टोरेज मोफत देणार आहे. त्यामुळेच गुगल वन आणि आय क्लाऊडच्या वर्चस्वाला अंबानी यांनी थेट आव्हान दिले आहे. गुगल वनमध्ये १०० जीबी स्टोरेज खरेदी करण्यासाठी १३० रुपये द्यावे लागतात, तर आय क्लाऊडमध्ये ५० जीबीसाठी ७५ रुपये द्यावे लागतात. असं असताना मुकेश अंबानी यांनी क्लाउड सेवा सुरू करण्याची घोषणा केल्याने हा त्यांचा मास्टरस्ट्रोक असल्याचं म्हटले जात आहे. जिओ आपल्या ग्राहकांना दिवाळीपासून ही खास ऑफर देणार आहे.

## वेब वर्ल्ड

### ज्ञानाचं भांडार




दोस्तांनो, यू ट्यूबवर माहितीचा खजिना असतो. इथे विविध चॅनेल्स असतात. यापैकी काही चॅनेल्स बघून तुम्ही तुमचं ज्ञान वाढवू शकता. 'अ सॅप सायन्स' या चॅनेलवर विज्ञानविषयक माहिती मिळेल. 'मिंटफिजिक्स' हे चॅनेल फिजिक्सविषयक माहिती देतं. गिटार शिकायची असेल तर 'जस्टीन गिटार' हे चॅनेल फॉलो करा. फोटोग्राफीशी संबंधित माहिती हवी असेल तर 'पीटर मॅकिनॉन' चॅनेल बघा.

**फिटनेस फंडा**

# ...अन्यथा लवकर म्हातारे व्हाल

दोस्तांनो, व्यायामामुळे तुम्ही तंदुरुस्त होता. वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. सकाळी छान ताजंतवानं वाटतं. हे जरी खरं असलं तरी काही चुकांमुळे तुम्ही खूप लवकर म्हातारे दिसू लागता. व्यायाम करताना कोणत्या चुका होतात? जाणून घेऊ.

✽ व्यायाम करताना शारीरिक स्थितीचा विचार करा. जीममध्ये व्यायाम करताना चुकीच्या पद्धतीने उभं राहिल्याने, वाकल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. यामुळे पाठीच्या कण्याला बाक येतो. मग तुम्ही वाकून चालू लागता. हे टाळण्यासाठी व्यायाम करताना शरीराच्या स्थितीकडे लक्ष द्या. चुकीच्या शारीरिक स्थितीमुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

✽ कार्डिओ हा खूप चांगला व्यायामप्रकार असला तरी त्याच्या अतिरेकाने शरीराचं नुकसान होऊ शकतं. विशिष्ट वयानंतर हाडं आणि स्नायूंना पुरेसा व्यायाम मिळाला नाही तर त्यांच्या कार्य मंदावतं. तसंच १८ ते ५० या वयोगटातल्या व्यक्तींनी वेट लिफ्टिंग आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग करावं, असं एक संशोधन सांगतं. स्ट्रेंथ ट्रेनिंगमुळे



स्नायूंना बळकटी मिळते. शिवाय कॅलरीही खर्च होतात.

✽'हाय इंटेंसिटी इंटरवल ट्रेनिंग' गरजेचं आहे. या व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. शारीरिक क्षमताही वाढते. या सगळ्यामुळे आपण बराच काळ तरुण रहातो.

✽ शरीर ताणण्याच्या व्यायामाकडे दुर्लक्ष करू नये. व्यायामाआधी आणि नंतर शरीर ताणायला हवं. शरीर ताणण्याचे व्यायाम केले नाहीत तर स्नायू आणि त्यातल्या टिश्यूंवर अकारण ताण येतो. तसंच या व्यायामामुळे शरीर लवचिक होतं आणि व्यायाम करताना त्रास होत नाही.

✽ सतत जीममध्ये व्यायाम करत राहिल्याने आपण तंदुरुस्त राहू हा समज चुकीचा आहे. व्यायामाप्रमाणेच शरीराला विश्रांतीचीही गरज असते. स्नायूंची झीज भरून काढण्यासाठी शरीराला वेळ देणं गरजेचं आहे. त्यामुळे एखादा दिवस विश्रांती घ्या.

**मॅच मेकिंग**

# आईसोबत खटके उडतात!

गेल्या दोन वर्षांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. आम्ही दोघं सध्या पीएचडी करत असून वर्षभरापासून लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये आहोत. माझ्या आईला आमचं असं 'लिव्ह इन' मध्ये रहाणं पसंत नाही. माझे तिच्यासोबत खटके उडतात. मी तीन वर्षांचा असताना माझ्या पालकांचा घटस्फोट झाला. त्यानंतर तिनेच मला वाढवलं. सध्या मी शिकतोय. त्यामुळे माझ्या शिक्षणाचा खर्च तीच उचलते आहे. पण मी लिव्ह इनमध्ये रहायला सुरूवात केल्यापासून ती सारखी माझ्यावर चिडते. दुसरीकडे माझी मैत्रीणही विचित्रच आहे. आम्ही काही काळ आमच्या कुटुंबासोबत राहून आलो की आमच्यात मतभेद होतात. त्यातच माझी मैत्रीण खूप रागीट आहे. ती



नेहमीच माझ्यावर हक्क गाजवण्याचा प्रयत्न करते. आई आणि मैत्रीण यांच्यामध्ये मी अडकून पडलोय. मला नैराश्य आलंय आणि काय करावं ते कळत नाही. मला मार्गदर्शन करा.

**उत्तर** : 'लिव्ह इन रिलेशनशीप' ही पूर्णपणे आधुनिक संकल्पना आहे. 'लिव्ह इन' म्हटलं की भल्याभल्यांचे डोळे विस्फारतात. आधीच्या पिढीला तर ही बाब फारशी मान्य होणार नाही. तसंच ही संकल्पना आपल्या भारतीय संस्कृतीत बसत नाही. त्यामुळे तुझ्या आईला लिव्ह इन रिलेशनशीप ही संकल्पना मान्य नसणं अगदी स्वाभाविक आहे. पण तू आईचं मतपरिवर्तन करू शकतोस. या नात्याबद्दल तू तिला सांग. तुझ्या भविष्यातल्या योजनांची माहिती दे. आई आणि पत्नी/मैत्रीण यांना जोडणारा धागा तूच आहेस. दोघींच्या कलाने घेऊन त्यांना समजावून सांग. शेवटी प्रत्येकाला आपल्या पद्धतीने जगण्याचा अधिकार आहे. पण इतरांची मतंही ऐकून घे.

**भटकंती**

# कोकणातले रम्य समुद्रकिनारे

गोव्यातले समुद्रकिनारे सुंदर आहेतच. पर्यटकांना या समुद्रकिनाऱ्यांची भुरळ पडते. यासोबतच कोकणातले समुद्रकिनारेही पर्यटकांना आकर्षित करतात. कोकणातले गणपतीपुळे, दिवेआगार, तारकर्ली हे समुद्रकिनारे प्रसिद्ध आहेत. मात्र इथल्या ऑफ बीट समुद्रकिनाऱ्यांवर फिरताना वेगळीच गंमत अनुभवायला मिळते. खूप शांत आणि रम्य वाटतं. सुट्टीत या समुद्रकिनाऱ्यांची सैर करायला हरकत नाही. कोकणातल्या अशाच काही सुंदर समुद्रकिनाऱ्यांविषयी...

✽ रत्नागिरीपासून साधारण २०० किलोमीटर अंतरावर वेलास बीच आहे. हा बीच ऑलिव्ह रिडले कासवांसाठी प्रसिद्ध आहे.

✽ दापोलीपासून २० किलोमीटर अंतरावर अंजार्ले बीच आहे. या परिसरातला कड्याचा गणपती पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे.

✽ रत्नागिरीपासून ८० किलोमीटर अंतरावर वेलनेश्वर बीच आहे. इथून जवळच असणारा अंजनवले किल्ला पहायला लोक इथे येतात.

✽ वेंगुर्ल्यापासून ८० किलोमीटर अंतरावर कोंडुरा बीच आहे. इथे विविध प्रजातींचे समुद्रपक्षी पहायला मिळतात. बरेच समुद्रपक्षी स्थलांतर करून इथे येतात.

✽ अलिबागपासून २० किलोमीटर अंतरावर कोरलाई समुद्रकिनारा आहे. कोरलाई किल्ला आणि दीपगृह ही इथली आकर्षणं आहेत.

✽ दापोलीतला करडे बीच डॉल्फिन्ससाठी प्रसिद्ध आहे.

✽ देवगडपासून जवळ असणाऱ्या कुणकेश्वरच्या समुद्रकिनाऱ्यावरही आल्हाददायक वाटतं. इथलं कुणकेश्वराचं मंदिर प्रसिद्ध आहे.





**वेगळ्या वाटा**

# ई-कॉमर्स कंपन्या देतात संधी

सध्या ई कॉमर्स कंपन्यांचा बोलबाला आहे. 'ॲमेझॉन', 'फ्लिपकार्ट'सह, 'स्वीगी', 'झोमॅटो' या कंपन्यांनी कमी वेळात खूप जास्त प्रगती केली आहे. या कंपन्यांमध्ये तरुणाईला संधी दिली जाते. मॅनेजमेंट आणि इंजिनिअरींगची पदवी मिळवलेले विद्यार्थी अशा कंपन्यांपासून करिअरची सुरूवात करू शकतात. डेटा सायन्स, प्रोडक्ट मॅनेजमेंट, डिझाइन, आयओएस आणि अँड्रॉइडचा विकास करण्याच्या प्रक्रियेसाठी या कंपन्या कुशल तरुणांची निवड करत आहेत.

फ्लिपकार्टसारखी कंपनी येत्या काळात युवा पदवीधरांच्या भरतीत ४० ते ५० टक्क्यांची वाढ करणार आहे. देशातल्या आघाडीच्या आयआयएम तसंच इंजिनिअरींग संस्थांमधल्या युवा गुणवत्तेला संधी देण्याचा या कंपन्यांचा प्रयत्न असतो. इतकंच नाही तर या कंपन्या युवांना प्रशिक्षणही देतात.

ॲमेझॉनसारख्या कंपनीनेही भारतात आपलं जाळं पसरवलं आहे. या कंपनीला भारतात जबरदस्त प्रतिसाद मिळाला आहे. म्हणूनच ही कंपनी भारतीय तरुणांची नेमणूक करण्यावर भर देते आहे. बऱ्याच कंपन्यांचा चांगले तंत्रज्ञ हवे आहेत. सर्वच कंपन्या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करतात. म्हणूनच या बदलत्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करणारे जाणकार त्यांना हवे आहेत. म्हणूनच तरुणांनी आपली कौशल्यं वाढवण्यावर भर द्यायला हवा.



**झटपट रेसिपी**

# मस्त साबुदाणा भेळ

दोस्तांनो, उपवासाला साबुदाण्याची खिचडी बनवली जाते. हा झटपट होणारा पदार्थ आहे. पण प्रत्येक वेळी साबुदाणा खिचडी खाऊन खूप कंटाळा येतो. उपवासाचे इतर पदार्थ वेळखाऊ असतात. अशावेळी झटपट होणारी साबुदाणा भेळ ट्राय करून बघा.



**सामग्री:** अर्धा कप साबुदाणा, एक बटाटा, दाण्याचं कूट एक चमचा, थोडे काजू, एक चमचा लिंबाचा रस, सैंधव मीठ, दोन चमचे शेंगदाणा तेल, बटाट्याचा फराळी चिवडा, चिरलेली कोथिंबिर.

**कृती:** साबुदाणा धुवून दोन ते तीन तास भिजवून ठेवा. बटाट्याचे छोटे तुकडे करून घ्या. आता गॅसवर कढई ठेवा. त्यात तेल घाला. तेल थोडं गरम झाल्यावर त्यात बटाटे घालून सोनेरी रंगावर तळून घ्या. काजूचे तुकडे करून घ्या. आता कढईत काजूचे तुकडे आणि शेंगदाणे घालून तळून घ्या. बटाटे, काजू आणि शेंगदाणे एका भांड्यात काढून ठेवा. आता याच तेलात साबुदाणा परतून घ्या. आता हा साबुदाणा भांड्यात काढा. त्यात तळलेले बटाटे, काजू आणि शेंगदाणे घाला. चवीनुसार मीठ घाला. त्यात बटाट्याचा चिवडा घालून हलवून घ्या. वरून कोथिंबिर घाला. आता लिंबाचा रस घालून मिक्स करा. यात डाळिंबाचे दाणेही घालता येतील.

**ग्रुमिंग**

# टिकवा केसांची चमक



दोस्तांनो, तुम्हीही वेगवेगळ्या हेअरस्टाईल करत असाल. आपली हेअरस्टाईल चांगली दिसावी असं तुम्हालाही वाटत असेल. मात्र यासाठी केसांची काळजी घ्यायला हवी. केस छोटे असले म्हणून काय झालं त्यांच्याकडे लक्ष द्यायलाच हवं. केसांची चमक टिकून रहावी आणि कोणतीही हेअरस्टाईल चांगली दिसावी, यासाठी काय करता येईल याविषयी...

✽ बरीच मुलं रोज केस धुतात. काही मुलं केसांना साबण लावतात. पण असं केल्याने केसांमधलं नैसर्गिक तेल नष्ट होतं. केसांच्या मुळाशी असलेल्या तेलामुळे केसांमधला ओलावा टिकून रहातो. दररोज केस धुतल्याने हे तेल नष्ट होतं आणि केस कोरडे होतात. त्यामुळे आठवड्यातून तीन वेळा केस धुवा.

✽ केसांसाठी कोणताही शँपू वापरून चालणार नाही. नैसर्गिक घटकांनी युक्त शँपू वापरणं योग्य ठरतं. तुमचा शँपू सल्फेट आणि पॅराबेन फ्री असावा.

✽ कंडिशनरचा वापर टाळू नका. कंडिशनरमुळे केसांना ओलावा मिळतो. केस छान मुलायम होतात.

✽ आठवड्यातून एकदा केसांना तेल लावा. यामुळे केसांमधला ओलावा टिकून राहिल. कुरळे केस असणाऱ्या मुलांनी नियमित तेल लावायला हवं.

✽ आपण घाईगडबडीत जोरात केस पुसतो. यामुळे केस गळू लागतात. म्हणूनच हलक्या हातांनी केस पुसा.

✽ केसांना शँपू लाऊन भागणार नाही. स्कॅल्पलाही नीट शँपू लावा. यामुळे स्कॅल्पवरची धूळ, घाण निघून जाईल.

✽ केसांवर फार प्रयोग करू नका. विविध उत्पादनांचा मारा करू नका. जेल किंवा स्प्रे अगदी कमी प्रमाणात लावा.

